कृषीवल

रायगड, रविवार, दि. ७ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹

## मराठा समाजाचा महायुतीला इशारा!

**नाशिक** : महायुतीत नाशिक लोकसभा मतदारसंघावरून जोरदार रस्सीखेच सुरु आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ हे देखील निवडणूक लढवण्यासाठी कमालीचे इच्छुक आहेत. मात्र या जागेची उमेदवारी छगन भुजबळ यांना मिळणार असे बोलले जात असताना आता सकल मराठा समाजाकडून छगन भुजबळांच्या विरोधात शड्डू ठोकण्यात आला आहे. नाशिक येथे सकल मराठा समाजाची पत्रकार परिषद पार पडली. यात मराठा समाजाचे पदाधिकारी म्हणाले की, छगन भुजबळ यांना उमेदवारी देण्याचे संकेत मिळत आहे. एका समाजाविषयी खालच्या पातळीवर बोलणाऱ्यांना पान २ वर

## मीनाक्षी पाटील यांचे बुधवारी उत्तरकार्य

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे उत्तरकार्य बुधवारी (दि.१०एप्रिल) त्यांच्या राहत्या घरी पेझारी येथे होणार असल्याची माहिती पाटील कुटुंबियांनी दिली आहे.



मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि. २९ मार्च) सकाळी निधन झाले. त्यांच्या अंत्ययात्रेला वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गज मंडळी, ग्रामस्थ, पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर गेल्या नऊ दिवसांपासून पेझारी येथे जाऊन वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळींनी पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले.

मीनाक्षी पाटील यांचे दशक्रिया विधी रविवारी (दि.०७ एप्रिल) श्रीवर्धन येथील हरिहरेश्वर येथे होणार असून बुधवारी (दि.१०एप्रिल) पेझारी येथे उत्तरकार्य होणार असल्याची माहिती पाटील कुटुंबियांनी दिली.

# तटकरे भाजपाच्या मांडीवर बसल्याने माझा
# दिल्लीचा मार्ग मोकळा

**अनंत गीते यांचे प्रतिपादन**




**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

प्रतिस्पर्धी उमेदवार सुनील तटकरे हे भाजपाच्या मांडीवर जाऊन बसल्याने माझा दिल्लीचा मार्ग मोकळा झाला आहे. २०२४ ची निवडणूक देशाच्या राजकारणाला कलाटणी देणारी असल्याने घटक पक्षांनी संघटीत होऊन लढल्यास संविधान वाचवण्याची लढाई आपण जिंकू, असे प्रतिपादन इंडिया आघाडीचे रायगड लोकसभेचे उमेदवार अनंत गीते यांनी केले.



अलिबाग काँग्रेसभवन येथील मेळाव्यात ते बोलत होते. देशात भाजपाने राहुल गांधी यांचा अपार छळ केला असतानाही ते संविधान वाचवण्याची लढाई लढत आहेत. राहुल गांधी यांच्याकडे प्रचंड संयम आहे. त्यांच्या संयमाला मी सलाम करतो. प्रत्येकाने त्यांच्यासारखे कणखर राहिले पाहिजे. देश हितासाठी आपला असाच संघर्ष असला पाहिजे, असे गीते यांनी स्पष्ट केले.

२०१९ ची निवडणूक मी दीड लाख मतांनी हरलो असतो, तर मी समजलो असतो की, मला जनतेने नाकारले आहे, मात्र साडे चार लाखांहून अधिक मते मला मिळाली. याचाच अर्थ मला रायगडच्या जनतेने स्वीकारले आहे. पान २ वर












## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

७ एप्रिल

१) श्री. उत्तमराव देवराम अहिरे
पिंपळभाट, अलिबाग, ७-४-१९४७
२) श्रीम. नीता प्रभाकर कवळे
अलिबाग, ७-४-१९४८
३) श्री. जनार्दन मारूती पोरे
अलिबाग, ७-४-१९५३
४) श्रीम. चंद्रकला जनार्दन मोकल
अलिबाग, ७-४-१९५४
५) श्री. सुभाष दत्तात्रय घरत
अलिबाग, ७-४-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग**

# आरसीएफची शाळा बंद करण्याचे षडयंत्र

## आरसीएफ प्रशासना विरोधात संतापाची लाट

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील आरसीएफ आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे यांच्यावतीने चालविण्यात येणारी कुरुळ आरसीएफ वसाहतीमधील गेली ४२ वर्षे सुरु असलेली शाळा बंद करण्याचा घाट घालण्यात आला आहे. याबाबत आरसीएफ प्रशासनाने शिक्षण विभागाला पत्र दिले आहे. या विरोधात पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.**



नवीन शैक्षणिक वर्षापासून पहिलीचे वर्ग बंद करण्यात येणार असून प्रत्येक वर्षी एक या प्रमाणे दहा बारा वर्षात संपूर्ण शाळा बंद करण्यात येणार आहे. याविरोधात पालकांनी आक्रमक भूमिका घेत याला विरोध केला आहे.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचे वर्ग आहेत. मोठ्या संख्येने येथे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदरची शाळा १९८१ साली मराठी व इंग्रजी माध्यमातून सुरु करण्यात आली गावातील मुले व परीसरातील इतर सर्व स्थानिक मुलांना मिळावा यासाठी शासकीय परवानगी देण्यात आली होती. तसेच मागील काही वर्षात जाणिवपूर्वक मराठी माध्यमच या शाळेतून बंद करण्यात आले आहे. आता तर संपूर्ण शाळाच बंद करण्याचा निर्णय पालक, विद्यार्थी आणि शिक्षक यांना अंधारात ठेऊन परस्पर आरसीएफ थळ प्रशासनाने घेतला आहे. २९ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या पत्राद्वारे रायगडच्या शिक्षणाधिकारी त्याबाबत कोणतेही सक्षम कारण दिलेले नाही. महाराष्ट्र राज्य बोर्ड असलेली हि शाळा आहे. थळ प्रशासन आर्थिक भार असल्याचे कारण देत आहे. तर याच कंपनीला देशात नवरत्न पुरस्कार मिळून कंपनी नफ्यात असून त्यांच्या रहिवासी वसाहत येथे सद्य परिस्थितीत करोडो रुपये खर्च करून नूतनीकरणाचे काम सुरु आहे. थळ प्रशासन बाहेर गावच्या गाव दत्तक घेते, याच शाळेच्या नावावर आयकरात सवलत घेते. तीच शाळा यांच्या अंतर्गत यांनी केला आहे.आरसीएफच्या या मनमानी निर्णयामुळे परीसरातील हजारो विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होणार आहे. या विषयामध्ये प्रशासकीय स्तरावरून योग्य ती चौकशी होऊन शाळा बंद होण्यापासून थांबविणे गरजेचे आहे. अन्यथा आरसीएफ थळ प्रशासनाविरोधात सामाजिक स्तरावरून जन आंदोलन उभे केले जाईल, असा इशारा धनंजय म्हात्रे यांनी दिला आहे.

सदरची शाळा आरसीएफ कर्मचारी, अधिकारी यांच्या पाल्यांसाठी कर्मचारी वेलफेअर निधीतून सुरू करण्यात आली होती. मात्र सध्या या शाळेत दहा टक्के देखील कर्मचाऱ्यांचे पाल्य शिकत नसल्याने या शाळेवर होणारा खर्च अनाठायी असल्याचे बोलले जाते. शाळेच्या व्यवस्थापनावर अन्य शाळा, संस्थांच्या तुलनेत जास्त खर्च केला जात आहे. त्यामुळे डेक्कन एज्युकेशन सोसायटीला देखील हा खर्च परवडणारा नसल्याचे बोलले जाते.



## अनंत गीते यांचे नांदगावच्या सिद्धिविनायकाला साकडे

**। कोर्लई । वार्ताहर ।**

रायगड लोकसभा मतदारसंघाचे इंडिया आघाडीचे उमेदवार माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांसह मुरुड तालुक्यातील नांदगावच्या प्रसिद्ध जागृत देवस्थान श्री सिद्धिविनायकाचे दर्शन घेऊन विजयासाठी साकडे घातले.

त्यांच्यासमवेत शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे,उप प्रमुख प्रशांत मिसाळ, अलिबाग मुरुड विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक प्रमोद भायदे, प्रशांत कासेकर, नांदगावच्या सरपंच सेजल घुमकर, उपसरपंच मेघा महेश मापगावकर, शिवसेना नेते नरेश कुबल, सुदेश घुमकर, काँग्रेसचे अस्लम हलडे, गणेश गाणार, योगेश पाटील, विक्रांत कुबल, भालचंद्र घुमकर, नितेश रावजी, मंजुम घोले, उदय थळे, प्रफुल्ल आरेकर, अलीम मुल्ला, सुरेश मालवणकर, चंद्रकांत देऊळकर, जया चोरघे, भक्ती चोरघे, अमित भोबू, कल्पेश मळेकर, आतिष आग्रावकर आदी उपस्थित होते.

## कृषी संशोधन केंद्रात सेवानिवृत्तांचा सत्कार

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राहिलेल्या सेवानिवृत्त व्यक्तींचा सत्कार कार्यक्रम येथील सह्याद्री अतिथी गृह सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी संशोधन संचालक डॉ. शिवराम भगत होते.व्यासपीठावर भात विशेषज्ञ डॉ.भरत वाघमोडे,अधिदान व लेखा अधिकारी प्रदीप कदम उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. भगत म्हणाले की, सेवानिवृत्त कर्मचारी आणि अधिकारी यांच्याप्रति कृतज्ञता म्हणून ऋणनिर्देश करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राची कामगिरी आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरविण्यात येत असून त्यात सेवानिवृत्त कर्मचारी,अधिकाऱ्यांचे मौलिक योगदान आहे,असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

डॉ. वाघमोडे म्हणाले की, सेवानिवृत्त व्यक्तींचा सत्कार करणे, हा स्तुत्य उपक्रम आहे. संशोधन केंद्राने विकसित व शिफारशीत केलेल्या विविध भात वाणांत मजूर वर्गाचाही वाटा आहे. यावेळी डॉ.पी. आर. चौधरी, डॉ.ए.एस. दळवी,आर. के कळंबे यांची समयोजित भाषणे झाली.याप्रसंगी १०२ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र, देऊन गौरविण्यात आले.यानिमित्ताने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांनी दिलेल्या शुभेच्छा सेवानिवृत्तीधारकांना कळविताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

## ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाचे उद्घाटन

**। वाघ्रण । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा ग्रंथालय संघ आणि सार्वजनिक वाचनालय अलिबाग तर्फे ग्रंथपालन अभ्यासक्रम वर्गाचे उद्घाटन डोंगरे हॉलमध्ये संपन्न झाले . सुरुवातीला ग्रंथ चळवळीच्या कार्यकर्त्या महाराष्ट्र राज्य माजी राज्यमंत्री श्रीमती मिनाक्षीताई पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर उपस्थित प्रमुख अतिथींचे स्वागत संयोजकांच्या वतीने करण्यात आले.

यावेळी प्रास्ताविक करताना सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने



बोलताना नागेश कुलकर्णी यांनी कै.ॲड. दत्ता पाटील आणि भाऊ प्रभाकर पाटील यांच्या चळवळीची आठवण करीत यंदाचे ३६ वे वर्ष असल्याचेदेखील सांगितले. या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख प्रशिक्षक जेएसएम कॉलेजचे ग्रंथपाल सुबोध डोहके, सारळ हायस्कूलचे ग्रंथपाल आशिष पारसमित, बामणगावचे ग्रंथपाल श्रीधर पाटील, रायगड जिल्हा ग्रथालय सघाचे अध्यक्ष संजय बोंदर्डे ,प्रकाश पाटील आदीनी उपस्थित ४० ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गातील विद्यार्थ्यांना दोन महिने चालणाऱ्या अभ्यासक्रम वर्गा संदर्भात प्राथमिक माहिती दिली. या वर्गाचे व्यवस्थापन सार्वजनिक वाचनालय डोगरे हॉलचे प्रमुख ग्रंथपाल व अभ्यासक्रम वर्गाचे व्यवस्थापक भालचंद्र वर्तक यांनी केले. त्यांना सहकार्य सहाय्यक ग्रंथपाल रंजिता माळवे आणि अमित धुमाळ व कर्मचारी वर्गानी केले. या संपूर्ण कार्यक्रमाला रायगड जिल्हा ग्रथालयाच्या ममता रोगे यांनीही हजेरी नोंदवली.

## महंत विवेकानंद शास्त्री यांचे जल्लोषात स्वागत

**। खांब । वार्ताहर ।**

सिद्धेश्वर संस्थान बीड येथील महंत तथा तळवली तर्फे अष्टमी या गावचे सुपुत्र विवेकानंद शास्त्री यांचे नडवली येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले. रोहा तालुक्यातील खांब पंचक्रोशीच्या वतीने श्री.क्षेत्र नडवली येथे संपन्न होत असलेल्या ६७ व्या अखंड हरिनाम सप्ताह प्रसंगी महंत विवेकानंद शास्त्री यांच्या हरिकिर्तनरुपी सेवेचे आयोजन ता.५ मार्च रोजी करण्यात आले होते.



यावेळी संपुर्ण नडवली ग्रामस्थ, महिला मंडळ व तरूण मंडळ तसेच मुंबई ठाणे मंडळ व आदिवासीवाडी ग्रामस्थ यांच्या वतीने त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.किर्तनरूपी सेवेला आगमन होतात महंत विवेकानंद शास्त्री यांनी गावातील श्री राम मंदिरातील देवतांना वंदन केले. आणि त्या मंदिरापासून ते किर्तन सभा मंडपापर्यंत लाठी काठी, ढोल ताशा, खालूबाजा व लेझीम पथकाच्या तालावर वाजत गाजत तसेच जय श्रीराम,जय भवानी, जय शिवाजी, हर हर महादेव अशा घोषणा देऊन शास्त्रीचे भव्यदिव्य व मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. शास्त्रीचे गावात आगमन होताच प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह दिसून येत होता.तर त्यांच्या किर्तनरूपी सेवेचे श्रवण करण्यासाठी रायगड जिल्ह्यातून भक्तांनी उपस्थिती नोंदवून श्रवणाचा लाभ घेतला.

## गणेशोत्सवानिमित्त भक्तांसाठी १० मेपासून आरक्षण खुले

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

यंदा ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाची धामधूम सुरू होणार आहे. कोकण मार्गावर सोडण्यात येणाऱ्या रेल्वेगाड्यांचे आरक्षण १२० दिवस आधी म्हणजेच १० मे पासून खुले होणार आहे.

नियमित रेल्वेगाड्यांसह गणपती स्पेशल गाड्यांची आरक्षित तिकीटे मिळवण्यासाठी चाकरमान्यांची तिकीट खिडक्यांवर चढाओढच सुरू होणार आहे.कोकणात जाणाऱ्या सर्व गाड्यांचे बुकिंग २ ते ३ मिनिटातच हाऊसफुल्ल होत असल्याने आरक्षित तिकिटांसाठी तिकीट खिडक्यांवर तासनतास ताटकळत उभे राहूनही चाकरमान्यांच्या पदरी निराशाच पडते. यंदा ७ सप्टेंबरला गणरायाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सव कालावधीत कोकण मार्गावरून धावणाऱ्या नियमित गाड्यांव्यतिरिक्त सोडण्यात येणाऱ्या गणपती स्पेशल गाड्यांची आरक्षित तिकिटासाठी ऑनलाईनप्रमाणेच तिकीट खिडक्यांवरही गर्दी उसळणार आहे.

कोकण मार्गावर नेमक्या किती गणपती स्पेशल चालवणार, हे अद्याप रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेले नाही; मात्र, १० मे पासून गणेशोत्सवात धावणाऱ्या गाड्यांचे आरक्षण खुले होणार आहे. त्यामुळे चाकरमान्यांना गणपतीसाठी गावी येण्याचे नियोजन करणे सुकर होणार आहे.

## देगाव शाळेतील विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

**। माणगाव । वार्ताहर ।**

तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा देगाव येथील सर्व विद्यार्थ्यांना शुक्रवार ५ एप्रिल २०२४ रोजी स्वदेश फाउंडेशनच्या प्रयत्नांतून मिंटेल ग्रुप मुंबई यांच्या मार्फत विविध साहित्यांचे वाटप मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.



यावेळी विध्यार्थ्यांना स्कूल बॅग, टिफिन डब्बा, पाण्याची बॉटल, खेळाचे साहित्य, शैक्षणिक साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास स्वदेश फाउंडेशनचे प्रतिनिधी म्हणून मेघना फडके, शीतल सूर्यवंशी, भीमराव भालेराव, सिद्धेश शिर्के, सुबोध काणेकर, तुषार तेटगुरे, दीप्ती खैरे, निनाद दर्गे उपस्थित होते. तसेच गाव अध्यक्ष सुरज महाडिक, उपाध्यक्ष किशोर कदम, गाव सल्लागार सुरेश गायकवाड, सचिव राजेश गायकवाड, खजिनदार विकास कदम, अध्यक्षा, साधना गायकवाड, राजिप शाळा देगाव मुख्याध्यपिका उर्मिला मोरे, पदवीधर शिक्षक शंकर शिंदे, सहशिक्षिका प्रतीक्षा आंबुर्ले सह शिक्षिका महानंदा हारगुंडे ,स्वयंपाकी समीक्षा दिवेकर, गावविकास समिती देगाव, ग्रामस्थ मंडळ देगाव, महिला मंडळ देगाव आदी उपस्थित होते.

देगाव शाळेतील विद्यार्थ्यांना साहित्य व खाऊ वाटप केल्याबद्दल शाळेचे पदवीधर शिक्षक शंकर शिंदे यांनी स्वदेश फाउंडेशन व मिंटेल ग्रुप मुंबई यांचे शाळेतर्फे व देगाव ग्रामस्थांतर्फे विशेष ऋण व आभार व्यक्त केले.

## इनरव्हील क्लब खोपोलीतर्फे १४ शिक्षकांना पुरस्कार

**। खोपोली । वार्ताहर ।**

खाजगी व शासकीय शाळांमधील प्रत्येकी एक उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार हा त्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या मदतीने निवडून दिलेल्या १४ शिक्षकांना इनरव्हील क्लबच्या मिटिंगमध्ये रोटरी क्लबच्या अध्यक्षा व इनरव्हील क्लबच्या पिडिसी डॉ सावित्री रघुपती यांच्या हस्ते अवॉर्ड व सर्टिफिकेट देण्यात आले. यावेळी अध्यक्ष श्रीदेवी यांनी आलेल्या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांचे स्वागत केले. यावेळी उपस्थित अवॉर्ड मिळालेल्या शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण प्रोजेक्टच्या प्रमुख सीएलसीसी डॉ.टिळक व ईनरव्हीलच्या इतर सदस्यांनी या प्रोजेक्टसाठी सहकार्य केले. या कार्यक्रमावेळी सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षक त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक आणि फॅमिली मेम्बर्स व ईनरव्हीलच्या सर्व सदस्या उपस्थित होत्या.

## ‘निवडणुकीसाठी बीएलओनी सतर्क राहावे’

**। म्हसळा । वार्ताहर ।**

आगामीलोकसभानिवडणुकीच्या अनुषंगाने तालुक्यातील सर्व बीएलओचीं सभा पंचायत समितीच्या सभागृहात घेण्यात आली. याप्रसंगी तहसीलदार समीर घारे यांनी सर्व उपस्थितांना महत्वाच्या सूचना देताना निवडणूक कालावधीत बीएलओनी आचारसंहितेचे तंतोतंत पालन करून सतर्क राहण्याचे आदेश दिले.

त्यामध्ये नमुना नं -६ फॉर्म ९ एप्रिलपर्यंत जमा करण्याच्या सूचना दिल्या. कोणत्याही प्रकारची राजकीय पोस्ट टाकू नये, दिव्यांग उमेदवारमध्ये ज्या मतदाराला अजिबात चालता येत नाही त्यांचा १२-ड फॉर्म भरावा, मतदान केंद्रावर देण्यात येणारे स्टिकर



दिलेल्या मुदतीतच लावणे,१ जानेवारी २०२४ रोजी प्रसिद्ध झालेली मतदार यादी विचारात घावी, ज्या मतदान केंद्रावर पिण्याच्या पाण्याची सोय करणे, ऊन असल्यामुळे सावलीची सोय करावी,स्वच्छता गृह,दरवाजे, खिडक्या, वीज सुविधा यांकडे गांभीर्याने लक्ष देणे. मतदान केंद्रावरील राजकारणाशी संबंधीत नेत्याचे फोटो काढून ठेवावेत, फलकावरील मंत्रिमंडळ यादी पुसून टाकणे अश्या सूचना देऊन बूथ लेवलला मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जनजागृती करणे, गावातील बंद घरातील मतदारांची चौकशी करून ते मतदार मतदानासाठी उपलब्ध राहतील कि,नाही याबाबत नोंदी ठेवणे. अशा अनेक सूचना तहसीलदार समीर घारे यांनी दिल्या. निवडणूक नायब तहसीलदार संध्या अंबुर्ले यांनीही बीएलओना अत्यावश्यक सूचना दिल्या.

# देशभरात भाजप विरोधी लाट

## अनंत गीते यांना विश्वास

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

देशभरातील जनतेत भाजप सरकारच्या विरोधात असंतोषाची मोठी लाट असल्याने इंडिया आघाडीचेच सरकार येणार असल्याचे प्रतिपादन रायगड लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांनी मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

काँग्रेसचे नेते तथा नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अस्लम हलडे यांच्या निवासस्थानी जमलेल्या आघाडीच्या कार्यकर्त्यांना गीते यांनी यावेळी संबोधित करताना या निवडणुकीत महायुतीच्या मोठमोठ्या नेत्यांना मतदार पराभूत करणार आहेत.यावेळी आपण देखील दोन लाखांच्या फरकाने निवडून



येणार असल्याचे सांगितले.

कुणबी समाजाची मते तर मला मिळणार आहेतच शिवाय मुस्लिम मतदारांचाही मोठा पाठिंबा मिळणार आहे.भाजप उमेदवाराला तिकीट न मिळाल्याने कार्यकर्ते नाराज आहेत.पेणच्या सभेचे वृत्त आपण पाहिलेच आहे.महाड, दापोली भागासह मुरुडमध्येही मलाच आघाडी मिळणार यात शंकाच नाही. यावेळी शेकापच्या नेत्यांसह त्यांचे कार्यकर्ते पेटून उठले आहेत शेकापच्या कार्यकर्ता मेळाव्यातील आमदार रोहित पवारांच्या अभ्यासू भाषणाचा चांगला परिणाम दिसून येत आहे.येत्या १५ एप्रिल रोजी आपण उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी उबाठा जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, उपप्रमुख प्रशांत मिसाळ, अलिबाग विधानसभा प्रमुख प्रमोद भायदे, नरेश कुबल, सुदेश घुमकर, अस्लम हलडे आर्दीनी बूथ कमिट्या व अन्य रणनीती बाबत चर्चा केली.

पान १ वरून

## दिल्लीचा मार्ग मोकळा

माझा पराभव हा निसटता होता, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

तुम्ही पक्ष, पक्ष नेतृत्वावर श्रध्दा आणि निष्ठा ठेवा, ती कधीच वाया जाणार नाही. राज्यात सत्ता बदल झाल्याच्या दिवशी शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मला रात्री फोन केला आणि म्हणाले, तुम्ही जो जिता वही सिकंदर हि म्हण ऐकली असेलच. पण मी त्यात जरा सुधारणा केली आहे. जो रुका (त्याच पक्षात थांबला) वही सिकंदर असे ठाकरे मला म्हणाले आणि त्याच रात्री मला रायगड लोकसभेसाठी कामाला लागायचे आदेश दिल्याचे गीते म्हणाले.

चीन आणि रशियासारखे हुकूमशाही राजवट मोदींना भारत देशात आणायची आहे. यासाठी ते संविधान बदलण्याची तयारी करत आहेत, मात्र त्यांना याच निवडणुकीत रोखले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी काँग्रेसचे ॲड. प्रविण ठाकूर, जे.टी.पाटील, श्रध्दा ठाकूर, राजा ठाकूर, भास्कर चव्हाण, योगेशे मगर, पिंट्या ठाकूर, शिवसेनेचे सुरेंद्र म्हात्रे, कमलेश खरवले यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अलिबागच्या नावात अलिबागकरांची अस्मिता दडली आहे. अलिबागचे नाव बदलायचे की तेच ठेवायचे याचा निर्णय अलिबागकरच घेतील. बाहेरुन येऊन कोणी असे करण्याचा प्रयत्न करत असेल, तर अलिबागकर जनता तो डाव हाणून पाडल्याशिवाय राहणार नाही. अनंत गीते या लढाईत अलिबागकरांच्यासोबत असेल असेही ते म्हणाले. निवडणुकीच्या तोंडावर हि दुर्देवी खेळी खेळली जात आहे. नवीन वाद, प्रश्न निर्माण करुन जनतेच्या मुळ प्रश्नांना बगल देण्याचे काम भाजपाचे राहुल नार्वेकर करत आहेत, असा टोला त्यांनी लगावला.

## मराठा समाजाचा महायुतीला इशारा!

उमेदवारी का दिली जात आहे? असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. ही पत्रकार परिषद कुठल्या उमेदवाराला उमेदवारी द्यावी म्हणून नाही. छगन भुजबळ यांना उमेदवारी देऊन पायावर धोंडा मारून घेऊ नका. छगन भुजबळ कायम मराठा समाजाच्या विरोधात आहे. भाजप म्हणते सर्व्हेवर चालतो, पण एकही माणूस म्हणणार नाही, भुजबळ यांना उमेदवारी द्या,असे पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तुम्ही मराठ्यांना डिवचण्याचे काम करत आहात. ४८ मतदारसंघात याचे परिणाम महायुतीला भोगावे लागतील. मराठ्यांचे हातपाय तोडण्याची भाषा केली. पावणे दोन आणि पावणे तीन लाख मतांनी पराभव झाला त्यांना पुन्हा उमेदवारी कशासाठी देत आहात, असा हल्लाबोल यावेळी करण्यात आला.

छगन भुजबळ यांच्या बाबतीत मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन भूमिका जाहीर करणार आहोत. छगन भुजबळ निवडणूक लढविणार असतील तर सकल मराठा समाजाचा उमेदवार त्यांच्यासमोर उभा करणार, अशी घोषणा यावेळी करण्यात आली. छगन भुजबळांना जर नाशिकमधून उमेदवारी मिळाली तर मराठा समाज त्यांच्या विरोधात नक्की कोणाला उभे करणार? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## ७५०० लिटर गावठी हातभट्टीची दारु केली नष्ट

**। पनवेल । वार्ताहर ।**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अवैध धंद्यावर कारवाई करण्याकरिता पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय वेनपुरे, पोलीस उपआयुक्त विवेक पानसरे, परिमंडळ ०२, पनवेल व सहा. पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी आदेश दिले आहेत. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांनी आज अवैध धंद्यावर कारवाई करत ७५०० लिटर गावठी हातभट्टीची दारु नष्ट केली.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि (प्रशा) प्रविण भगत, पोउपनि अभयसिंह शिंदे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार है अवैध धंद्यावरील कारवाईकामी पोलीस ठाणे हद्दीत गस्त करित असताना कुंदेवाहळ गावच्या हद्दीतील जंगलात काही व्यक्ती दारु विक्रीसाठी माळण्याचा व बनिवण्याचा धंदा करीत असल्याचे माहित पडले. या अनुषंगाने पंचासह जावून सदर ठिकाणी छापा टाकला असता २५० लिटरचे २२ प्लास्टीकचे पूर्ण भरलेले बॅरलमध्ये एकूण १,१०,००० रूपये किमतीचे ७५०० लिटर कच्च्या दारुचे नवसागर द्रव्य तसेच दारु बनविण्यासाठी लागणारे साहित्य मिळून आले. यामध्ये किती आरोपींचा सहभाग आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यामार्फत अधिक तपास सुरु आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मी खालील वर्णनाची मिळकत जमीन सदर जमीनीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी घेण्याची ठरविलेली आहे. सदरहु जमीन ही सदर जमीनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नांवे आहे त्या मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पोसरी, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील मिळकत.**

| जमीन मालकाचे नांव | गावाचे नांव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| श्रीमती लता जगन्नाथ कुलकर्णी रा - कर्जत, तालुका - कर्जत | पोसरी | १९ | ५ | ०-१०-८० | ०-२५ |

तरी वरील प्रमाणे मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, साठे करार, ताबा, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षिस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती कुळवहिवाट, इजमेंट, चार्ज, मृत्युपत्रांकित, दान, लिज, लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असलेस संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाचे आंत खालील लिहिलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून त्यासंबधी कोणाचेही हक्क हितसंबध नाहीत असे गृहित धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करु मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली.

दिनांक ०६/०४/२०२४

**सौ. मीना महेंद्र थोरवे**
रा - पोसरी, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड.
मोबाईल नंबर - ९०२८३४७७७६

# विविध मान्यवरांकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन










शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि.२९) निधन झाले. निधनाची वार्ता कळताच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून पेझारी येथे जाऊन पाटील कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली.

शनिवारी (दि.६) पेझारी येथे जाऊन आ. शेखर निकम, तत्कालीन जिल्हाधिकारी योगेश म्हसे, शासकीय अधिकारी जगन्नाथ विरकर, उपजिल्हाधिकारी विठ्ठल इनामदार, व्यवसायिक विवेक तलवार, राज्यातील विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांची भेट घेत सांत्वन केले. यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, युवा नेते सवाई पाटील, आंबेपूरच्या सरपंच सुमना पाटील आदी पाटील कुटुंबिय व कार्यकर्ते उपस्थित होते.





● माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांना रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पनवेल शाखेच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी बँकेचे विद्यमान संचालक संतोष पाटील तसेच बँकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# अवैध गावठी दारूच्या भट्ट्यांवर कारवाई

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील उसर ठाकूरवाडी येथे डोंगराळ भागात गावठी दारू तयार करण्याच्या भट्ट्या लावल्या जात असल्याची गुप्त माहिती पाली पो. शिपाई बीट मार्शल व जनरल ड्युटी अंमलदार अतुल चंदनशिवे यांना मिळाली. त्यांनी तात्काळ पाली पो. निरीक्षक सरिता चव्हाण यांच्याशी संपर्क साधून चव्हाण यांनी आपले सहकारी भास्कर गच्चे, दिनेश घाडगे. धर्मेंद्र म्हात्रे यांना घेऊन गुरुवारी (दि.४) उसर ठाकूरवाडी येथील अवैध गावठी धंद्यावर कारवाई केली.



या ठिकाणी बेवारस स्थितीत दारूसाठी लागणारे साहित्य प्रत्येकी ५०० लि. क्षमतेच्या दोन टाक्या व प्लास्टिकच्या २०० लि. क्षमतेच्या तीन टाक्यांमध्ये १६०० लिटर गावठी हातभट्टीची दारू तयार करण्याचे गुळ, नवसागर मिश्रित पिवळ्या रंगाचे रसायन प्रति लिटर पन्नास रुपये प्रमाणे एकूण ८०,००० रुपये तसेच ५०० लिटर क्षमतेचे जर्मनचे पातेले घटनास्थळी उद्ध्वस्त करण्यात आले.

> पाली पोलिसांच्या या कारवाईमुळे छुप्या धंद्यांना लगाम लागून अनेक उध्वस्त होणाऱ्या कुटुंबाचे रक्षण होईल याची खात्री महिला वर्गांना वाटत आहे.
>
> – समृद्धी यादव
> सामाजिक कार्यकर्त्या

दरम्यान, मिळून आलेल्या रसायनापैकी एक लिटर क्षमतेच्या प्लास्टिकच्या बॉटलमध्ये नमुन्याकरता रसायन काढून कलीना-मुंबई येथे पाठविण्यात आले. उर्वरित रसायन व हातभट्टीचे साहित्य वाहतुकीस अवजड असल्याने जागीच नष्ट करण्यात आले. त्यावर पंच अशोक मारुती दळवी, पोलीस पाटील आपटवणे यशवंत तुकाराम चोरगे, पोलीस पाटील सिद्धेश्वर खुर्द व पोलिसांच्या सह्यां कागदी लेबल लावण्यात आले. याचा पुढील तपास पाली पोलीस स्टेशन करीत आहे.

# निवी जंगलात हातभट्टीवर छापा



**। धाटाव । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील निवी आदिवासी जंगल परिसरात गावठी दारूच्या हातभट्टीवर रोहा पोलिसांनी पहाटे छापा घातला. या टाकलेल्या छाप्यात १२०० लिटर दारु साठ्याच्या रसायनासहित अंदाजे ५५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केल्याने या परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

यावेळी दोन ठिकाणी गावठी हातभट्टीची दारू तयारीचा मुद्देमाल जप्त करून पोलिसांनी जागेवर उदध्वस्त केला. यामध्ये बाराशे लिटर गूळ नवसागर मिश्रित तयार रसायन, ६ लोखंडी व प्लास्टिक ड्रम, साहित्य अंदाजे ५५ हजार रुपयांचा माल उदध्वस्त केला.

कारवाई दरम्यान कोणीही व्यक्ती हाती लागली नाही. ही कारवाई पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक येदाळे, हनुमंत धायगुडे यांसह कर्मचाऱ्यांनी केली. संबधित कारवाईचे सर्वच स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

# रसायनीत दारुच्या हातभट्टीवर धाड

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा परिसरातील वडगाव डोंगराळ भागात गैरफायदा गावठी दारुच्या हातभट्टीवर धाड टाकून १,२०,००० हजाराचा साहित्याचा साठा सापडला. याबाबत माहिती अशी की, वडगाव डोंगराळ भागात सावळाराम दशरथ पवार (वय ३७)याने अवैध गावठी हातभट्टीची तयार दारु करण्याकरिता एकूण २४०० लिटर गुळ मिश्रीत रसायन असे एकूण १,२०,००० हजार रुपये किंमतीचा प्रोव्हीजन साहित्याचा साठा करुन ठेवला होता. रसायनी पोलिसांची चाहूल लागताच तो तेथून पसार झाला. यात एक लाख किंमतीचे निळ्या रंगाचे १० प्लास्टिकचे २०० लिटर क्षमतेचे ड्रम मिळून आले. प्रत्येक ड्रमामध्ये २०० लिटर प्रमाणे एकूण २००० लिटर दारु तयार करण्याचे



गुळ मिश्रीत तांबड्या व सफेद रंगाचा उग्रवास येत असलेला रसायन प्रति लिटर ५० रुपये किमतीचे ड्रम जप्त केले.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिंदे, सहाय्यक फौजदार कोलेकर, मंगेश लांगी, डफल यांनी कारवाई केली. दरम्यान, मिळून आलेल्या रसायनापैकी एक लिटर क्षमतेच्या प्लास्टिकच्या बॉटलमध्ये नमुन्याकरता रसायन काढून उर्वरित रसायन व हातभट्टीचे साहित्य वाहतुकीस अवजड असल्याने जागीच नष्ट करण्यात आले.

# वणव्यामुळे सुप्रीम कंपनीला आग



**। पाली /बेणसे । वार्ताहर ।**

पाली खोपोली राज्य महामार्गावरील सुप्रीम कंपनीत वणव्यामुळे भीषण आग लागली होती. या आगीमध्ये सुप्रीम कंपनीतील अनेक वस्तू जळून खाक झाल्याने कंपनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दुपारच्या उन्हात भीषण आग लागल्याने आग विझवणे शक्य नव्हते. त्यामुळे तात्काळ रोहा येथील सुप्रीम कंपनीला कळवून अग्निशमन दलाच्या गाड्या बोलावून आग विझवण्यात आली.

वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे नुकसान तर होतेच त्याचबरोबर वनसंपदा व पशु पक्षांची होरपळ होत आहे. आणि बहुतांश वणवे हे मानवनिर्मित लावले जात आहेत. वणव्यामुळे लागलेल्या आगेची ही दुसरी घटना आहे. ही आग वणव्यामुळे लागली होती. या आगीत दोन्ही गोदामातील सामान व गोदाम बाहेर उभी असलेली तीनचाकी वाहन जळून खाक झाले होते.

# सुजय विखेंच्या सभेची अनधिकृत बॅनरबाजी

**। पनवेल । वार्ताहर ।**

महायुतीचे नगर दक्षिणचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत रविवारी (दि.७) कामोठे वसाहतीत पनवेल नवी मुंबई आणि मुंबई स्थित पारनेरकरवासीयांचा परिवार संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र, या मेळाव्यानिमित्त पनवेल पालिका हद्दीत बिना परवानगी मोठ्या प्रमाणात बॅनर बाजी करण्यात आली असल्याने बिना परवानगी पोस्टर आणि बॅनर लावून आचार संहितेचा भंग केला जात असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील पारनेर विधानसभा मतदार संघातील मतदारांची मोठी संख्या पनवेल पालिका हद्दीत वास्तव्यास असून, पारनेरकर वासियांनमध्ये मोठ्या प्रमाणात एकजूट असल्याचे




पाहायला मिळते. नवी मुंबईमधील पारनेरकरवासीयांच्या एकजुटीचा आ.निलेश लंके यांनी राजकारणात शिताफीने वापर केला. त्या अनुषंगाने या परिवार मेळाव्याचे आयोजन करून करण्यात आले असल्याचे विजुभाऊ औटी मित्र परिवाराने सांगितले आहे. सदर परिवार संवाद मेळावा यशस्वी करण्यासाठी महायुतीतील सर्व घटक पक्ष, तसेच विजुभाऊ औटी मित्र परिवार, कामोठे रहिवाशी सांस्कृतिक युवा मित्र मंडळ, संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशन, सर्व पारनेरकरवासीय काम करत आहेत. मात्र, हा मेळावा यशस्वी करण्यासाठी कामोठे तसेच इतर परिसरात आचार साहितेच्या काळात लावण्यात आलेले बॅनर चर्चेचा विषय ठरत असून, आचार सहितेच्या काळात लावण्यात आलेल्या या बॅनरवर कारवाई होणार का असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# उन्हाळ्यामुळे पनवेलकर त्रस्त

**पनवेल :** उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने शहरातील मुख्य बाजारपेठेसह वसाहतीमधून सर्वच रस्त्यांवर दुपारी शुकशुकाट पसरू लागला आहे. नागरिकांनी दैनंदिन कामाच्या वेळापत्रकात बदल केल्याने बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल मंदावली आहे. सकाळी आठ वाजल्यापासूनच उन्हाचा चटका जाणवत असून कमाल तापमान ३६-३८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले आहे. त्यामुळे सकाळच्या सत्रात आपली कामे आटोपण्यावर बहुतांश नागरिकांचा भर आहे. उन्हाचा ताप वाढल्यामुळे सकाळी अकराच्या आत घरात अशी स्थिती ग्रामीण भागात आहे. दुपारच्या सत्रात घरात विश्रांती घेणे नागरिकांनी पसंत केले आहे.

# रायगड डाक विभाग अव्वल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**




रायगड टपाल विभागाने वर्षभरात ६० हजार १२५ नवे खाते उघडण्यात यश मिळवले. उद्दिष्ट पूर्ततेचा हा प्रमाण १२८.७० टक्के इतके असून या कामगिरीमुळे रायगड विभागाने महाराष्ट्र आणि गोवा राज्यांतील दहा अव्वल टपाल विभागात स्थान मिळवले आहे.

टपाल विभागाने देश व राज्य पातळीवर २९ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीत बचतीच्या वेगवेगळ्या योजना सुरू करून नवीन खाते सुरू करण्यासाठी ङ्गनया साल, नया जोशफ नावाची स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये रायगड टपाल विभागाचे अधीक्षक सुनील थळकर यांनी स्थानिक जिल्हा टपाल अधीक्षक म्हणून काम करत कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देत विविध योजना राबवल्या.

रायगड टपाल विभाग हा जरी ग्रामीण विभाग असला तरी इथे शहराप्रमाणे कामगिरी करता येईल, अशी मानसिकता निर्माण केल्याने चालू आर्थिक वर्षात शहरी विभागाला मागे टाकत महाराष्ट्र व गोवा राज्यात दहा उत्कृष्ट टपाल विभागांत स्थान मिळवले आहे. स्पर्धेत रायगड डाक विभागाने १२८.७० टक्के टार्गेट पूर्ण करत ६० हजार १२५ नवीन खाती उघडली आहेत.

## स्थानिक बाजारपेठेत कैऱ्या खातात भाव

# आदिवासी महिलांना हक्काचा रोजगार

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

गावरान कच्च्या कैऱ्यांचा हंगाम सुरू झाला आहे. जिल्ह्यातील बाजारापेठांमध्ये बहुतांश ठिकाणी गावरान कैऱ्या विक्रिसाठी आल्या आहेत. उन्हाळ्यात आंब्यांप्रमाणेच कैरीची जोरदार खरेदी होत असते. कैरीच्या दरांत मोठी वाढ झाली आहे. स्थानिक बाजारपेठेत कैरीच 'भाव' खात आहे. २० रुपयांना पाच ते सहा कैऱ्या असलेला एक वाटा मिळत आहे. या कैऱ्या खरेदीसाठी ग्राहक मोठी गर्दी करत आहेत. जिल्ह्यातील बहुतांश भागांमधील आंब्यांना कैऱ्या लागल्या आहेत. काही ठिकाणी आंब्याला परिपक्व कैऱ्या आल्या आहेत. आदिवासी महिला, फळ व भाजी विक्रेते या कैऱ्या घेवून बाजारात विक्रिसाठी येत आहेत. काही ठिकाणी किलोने कैऱ्या मिळत आहेत. ताई शिद या कैरी विक्रेतीने सांगितले की यंदा कैऱ्यांचा भाव वाढला आहे. काही दिवसांनी आवक वाढल्यावर मुबलक कैऱ्या येतील व भाव उतरेल. जिल्ह्यातील काही फळविक्रेत्यांकडे स्थानिक कैऱ्यांबरोबरच कर्नाटकी कैऱ्या विक्रीसाठी आल्या आहेत.



### आदिवासींना रोजगार

जंगलात मिळणाऱ्या या गावरान कैऱ्या आदिवासीबांधव तोडून स्थानिक बाजारात विकायला आणतात. या कैऱ्या विकून आदिवासी महिलांना चांगला रोजगार देखील मिळतो.

### जेवणाची लज्जत वाढवितात

ताज्या आणि सुक्या मासळीचे कालवण, वरण यामध्ये कैऱ्या टाकल्या जातात. त्यामुळे जेवण रुचकर व लज्जतदार होते. कच्च्या कैऱ्या बारिक कापून मसाला, हळद, तेल आणि मीठ टाकुन खाल्ल्या जातात.

# श्रीवर्धनमध्ये बिबट्याची दहशत

**। दिघी । वार्ताहर ।**

बिबट्याचे नावाने अनेकांचा थरकाप उडतो. श्रीवर्धन तालुक्याचे एक टोक असणारे नानवली गाव येथे गुरुवारी (दि.४) रात्रीच्यावेळी मुख्य रस्त्याला बिबट्याचे दर्शन झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. गेली तीन दिवस सर्वे ते नानवली मार्गावर मुख्य रस्त्याला वावरत असताना हा बिबट्या अचानक येणाऱ्या वाहनांच्या आवाजाने नानवली परिसरातील असलेल्या झाडा झुडपांमध्ये लपून बसतो व पुन्हा रात्री बेरात्री बाहेर येतो असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. आता बिबट्याने आपला मोर्चा रहिवासी परिसरात वळविल्यामुळे नागरिकांमध्ये



भीतीचे वातावरण आहे.

तालुक्यातील नानवली परिसर म्हणजे जंगल क्षेत्राला जोडून असणारे गाव, तसेच दिघी खाडीला लागून असल्याने हा दुर्गम आणि शांत परिसर म्हणून ओळखला जात आहे. विशेष म्हणजे सदर बिबट्या दिसल्यापासून सर्वांना खबर लागल्याने परिसरात आणखीच दहशत निर्माण झाली आहे. कोणत्याही परिस्थितीत याचा बंदोबस्त करण्याची मागणी आता नागरिकांनी केली आहे. खाडी लगत असणाऱ्या दिघी, नानवली, सर्वे या भागात मोठ्या प्रमाणात झुडपी जंगल आहे. विशेषता नानवली-सर्वे हा आड मार्ग असल्याने वाहनांची ये-जा कमी प्रमाणात आहे. त्यामुळे या परिसरात बिबट्यासह इतर प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असल्याचे समजते आहे.

सद्या वाघ जंगल सोडून मानववस्तीत आल्याने नागरिकांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याच्या दहशतीमुळे जंगल परिसरातील लोकांचे जगणे मुश्किल होऊन बसले आहे, शेतीची हंगामी कामे करणे, किंवा मिळेल ते काम करून आपला प्रपंच चालविणे, ही या लोकांची कामे आता बिबट्याच्या भीतीमुळे खोळंबली जाणार आहेत. त्यामुळे वनविभागाकडून जोपर्यंत बिबट्याचा बंदोबस्त लावला जात नाही, तोपर्यंत गावकऱ्यांधील भीतीचे वातावरण दूर होणार नाही, हेही तितकेच खरे आहे.

> गुरुवारी रात्रीच्या वेळी नानवली ते सर्वे रस्त्याने बाइकने जात असताना बिबट्या दिसला. आम्ही मागच होतो. गाडीच्या आवाजाने तो पळून गेल्याचे निदर्शनास आले.
>
> – पंकज हांडे,
> ग्रामस्थ, नानवली.

# शिक्षकांना ई-रिक्षा प्रवासाची सवलत

। नेरळ । प्रतिनिधी ।

**माथेरानमध्ये विद्यार्थ्यांची पायपीट कमी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने पर्यावरण पूरक ई रिक्षा चालविली जाते.मात्र या ई रिक्षामधून विद्यार्थ्यांच्या शिक्षकांना सवलतीमध्ये ई रिक्षामधून प्रवास करता येत नव्हता.येथील कॉन्व्हेन्ट शाळेचे शिक्षक योगेश जाधव यांनी आपल्यालादेखील सवलतीच्या दरात ई रिक्षामधून प्रवास करता यावा अशी मागणी केली आणि अखेर माथेरान पालिकेने शिक्षकांसाठी ही सेवा पूर्ववत सुरु केली.**



माथेरानमध्ये शाळा या शहरातील नागरी वस्तीच्या अगदी विरुद्ध दिशेला आहेत. त्यामुळे तेथे विद्यार्थ्यांना जाताना पुरती दमछाक होते.हे लक्षात घेवून विद्यार्थ्यांची पायपीट थांबावी आणि ज्येष्ठ नागरिकांचे कष्ट कमी व्हावेत, यासाठी पर्यावरण पूरक ई रिक्षा सुरू करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यासाठी माथेरानमधील श्रमिक हातरिक्षा संघटना यांनी १२ वर्षे न्यायालयीन आणि कायदेशीर लढा दिला होता. पर्यावरण पूरक ई रिक्षाचा पायलट प्रकल्प सुरू झाल्यावर माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेने सर्व शाळांमधील विद्यार्थी यांच्यासाठी एकवेळचा प्रवास करण्यासाठी पाच रुपये आणि शहरातील अन्य नागरिक यांच्यासाठी ३५ रुपये असा दर निश्चित केला होता.त्यानुसार प्राचार्य गव्हाणकर हायस्कूल,सेंट झेवियर्स हायस्कूल आणि नगरपरिषद शाळांचे विद्यार्थी यांच्यासाठी आणि त्या शाळांमधील शिक्षक यांच्यासाठी एकेरी प्रवासासाठी पाच रुपये दर निश्चित करून सवलत दिली होती. जानेवारी २०२४ पासून पर्यावरण पूरक ई रिक्षाचा दुसरा पायलट प्रकल्प राबविला जात आहे.त्यावेळी माथेरान मधील स्थानिकांच्या विविध विषयावरील आयोजित बैठकीत मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्याकडे गलेलठ्ठ पगार घेणाऱ्या शिक्षकांना ई रिक्षामधून सवलत कशासाठी? असा प्रश्न उपस्थित केला होता.

त्यानंतर पाच महिने सुरू असलेली सवलत बंद करून माथेरानमधील शाळांचे शिक्षक यांना सर्वसामान्य प्रवासी यांच्याप्रमाणे ३५ रुपये दराने प्रवास करावा लागेल असे निर्णय पालिकेने घेतला होता.त्या निर्णयाविरुद्ध माथेरानमधील संयुक्त वन व्यवस्थापन समिती अध्यक्ष आणि माथेरान नागरी पतसंस्थेचे सचिव योगेश जाधव यांनी माथेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्याकडे लेखी पत्र देत नाराजी व्यक्त केली होती.सेंट झेवियर्स हायस्कूलमधील शिक्षकांना पाच आकडी देखील पगार नाही आणि ते शिक्षक महिन्याचे ई रिक्षाचे २१०० रुपये भाडे कसे भरू शकतात?असा प्रश्न उपस्थित केला होता.

माथेरान पालिका विद्यार्थी आणि शिक्षक यांना मासिक पासेस देत असल्याने पालिकेने पाच रुपये एकेरी प्रवासाची अट घातल्याने शिक्षक वर्गात नाराजी पसरली.मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी शिक्षकांचे म्हणणे योग्य असल्याचे मान्य करीत सवलत पुन्हा सुरू केली आहे.आता पूर्वीसारखे सर्व शाळांचे शिक्षक हे सवलतीच्या दरात एकेरी प्रवास करणार आहेत.

> प्रसार माध्यमांनी आमच्या शिक्षकांच्या तक्रारीची दखल घेतली आणि त्यानंतर माथेरान पालिकेनेदेखील त्या विषयकडे सकारात्मक पाहत पुन्हा एकदा माथेरानमधील शाळांचे शिक्षक यांना सवलतीच्या दरात ई रिक्षामधून प्रवास करता येऊ लागला आहे.
> – योगेश जाधव (शिक्षक)

# पक्ष्यांना उष्माघाताचा धोका

। रायगड । प्रतिनिधी ।

अवकाळी पाऊस, हवामान बदल, भरदुपारी पडणारे कडक ऊन अशा वातावरणाची झळ केवळ माणसांनाच नव्हे तर पशु, पक्ष्यांनाही पोहचू लागली आहे. अन्न, पाण्याची शोधाशोध करण्यासाठी पक्ष्यांना भटकंती करावी लागत आहे. पक्ष्यांनादेखील उष्म्याचा त्रास जाणवू लागला आहे. त्यामुळे पक्ष्यांची तहान भागवण्यासाठी बाल्कनी, गच्ची, खिडकीत झाडांवर आदी ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्याचे आवाहन पक्षीप्रेमींनी केले आहे.

रायगडात उष्म्याचा पारा वाढला आहे. कडक उन्हाळा सुरू झाला आहे. सकाळी आठ वाजल्यापासूनच उन्हाचे चटके बसत आहेत. माणसांप्रमाणेच पक्ष्यांनादेखील उन्हाचा त्रास अधिक होत आहे. सकाळी अन्नाच्या शोधात बाहेर पडणाऱ्या पक्ष्यांना उष्मा सहन करावा लागत आहे. काही वेळा रस्त्याच्या कडेला अनेक पक्षी मुर्च्छित अवस्थेत पडलेले आढळून येत आहेत. त्यामुळे पक्ष्यांची तृष्णा भागवण्यासाठी घराची खडकी, बाल्कनी, टेरेस आदी ठिकाणी पाणवठे करणे आवश्यक आहे.

पक्षी उष्म रक्तीत आहेत. अनेक प्रकारच्या पिसांनी त्यांचे शरीर आच्छादलेले आहे. त्यामुळे उष्म्यात शरीरात उष्णतेचे प्रमाण वाढते. पक्षी पाणी कमी पितात. उन्हात त्यांना पाण्याची जास्त आवश्यकता असते. पोटातील पाण्याचा अंश कमी झाला की हवेत बरेच वेळा उडणारा पक्षी खाली कोसळतो. सकाळच्या वेळी अन्नाच्या शोधात पक्षी खूप दूर अंतरावर जातात. उष्म्याचा अंदाज न आल्याने उडता उडता पोटातील पाण्याची मात्रा कमी होण्याची शक्यता असते. अशा वेळी नागरिकांनी पक्ष्यांसाठी पाणवठे करावेत. तसेच याच्या जनजागृतीसाठी समाजमाध्यमांचा वापर करावा, असे आवाहन पक्षीप्रेमींनी केले आहे.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९

■ शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणी ४८ शाखा, वेबसाईट नोंदणीसाठी -९२२६७६६१२९

■ अकाऊंटंट पाहिजे- जीएसटी बील व रिर्टनस्चा कमीत कमी २ वर्षे अनुभव असावा. प्रत्यक्ष भेटा. संपर्क ९६२३१११४६०. एम.जे. एन्टरप्रायजेस, ब्राह्मण आळी, अलिबाग.

■ अलिबाग व जवळच्या भागातील दर महिन्यास ३०० नग सोललेले नारळ पाहिजेत. मोबाईल : ९८६७१११७०५

■ फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही. असे दोन २ BHK फ्लॅटस त्वरीत विकणे आहेत. पहिल्या फ्लॅटची किंमत ७३ लाख व दुसऱ्या फ्लॅटची किंमत ८३ लाख संपर्क : ८६९८६८२१२१

■ पॅकिंग, कटिंग, चेकिंग तसेच शिवणकामासाठी महिला मुली पाहिजेत. संपर्क : ९०११२९३१२१, ७२१९३०८००६

■ जमीन विकणे आहे- घर/शाळा/कॉलेज किंवा इतर व्यवसायासाठी उपयुक्त अशी मेन रोडटच/आतील रोडटच/कमी किंमतीतील आतील जमीन. विकणे आहे. ७०६६१३८३६८

■ भेरसे येथे ३० गुंठे जागा विकणे आहे व वावे नाक्यावर जागा विकणे आहे. तसेच मुरुड बीचपासून १२ कि.मी. अंतरावर रोडटच १ एकर जागा विकणे आहे. मो. ८२०८२९०६६२/९३७०१२६२५५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अलोक रेवतीशरण गोयल यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे बार्णे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ४२/२/ब | ०-५८-०० हे आर पॉ | २-३२ |
| ४२/६ | ०-०५-८० हे आर पॉ | ०-०६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०७/०४/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९ ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णन:- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पनवेल रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती पनवेल येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे :- गिरवले ता:- पनवेल, जि:- रायगड**

| सर्व्हे नं. | शेतकऱ्यांचे नांव | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| ९०/३ | श्री. राघो मारुती भोमकर | ०.९३.१० | १६.४४ |

वर नमुद कलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबदल विघमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही, कसलाही कुळ,वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यारपत्र, विकसित करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणर नाही. हे सर्वास कळावे.

ठिकाण:-पनवेल सही/-
दिनांक:-०६/०४/२०२४ **ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता : शॉप नं.९०५-९०८, शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं-८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई. ४००६१४.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णन:- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पनवेल रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती पनवेल येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे :- सोमटणे ता:- पनवेल, जि:- रायगड**

| सर्व्हे नं | शेतकऱ्यांचे नांव | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| ९७/५/क | श्रीमती. इंदुबाई बाळाराम भोपी व इतर | ०.२१.० | ३.०० |

वर नमुद कलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विघमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वास कळावे.

ठिकाण :-पनवेल सही/-
दिनांक :-०६/०४/२०२४ **ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता : शॉप नं.९०५-९०८, शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं-८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई. ४००६१४.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाच्या मौजे वावे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मनोज हरीश गोयर असून त्यांचेकडून विकत घेण्याचे ठरविलेला असून सदर मिळकतीचा साठेकरार दि.२७/०३/२०२४ रोजी विद्यमान मालक श्री. मनोज हरीश गोयर यांनी आमच्या अशिलांस करून दिलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरोसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांना सदरच्या मिळकतीचा व्यवहार करण्याचा ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | मालमत्ता क्र | गाळा नं. | क्षेत्र (चौ. फुट) |
|---|---|---|---|
| वावे. ता. अलिबाग, जि. रायगड | १९६२/२ | २ | २०० |

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी ताबा वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र पुराव्यासहीत सादर करावी.

मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग **ॲड. पंकज एम. पाटील**
तारीख : ०६/०४/२०२४ मु.पो. कुरूळ, अलिबाग- रायगड
९२७२५१५४५०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक सुदाम रामा जोशी यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|
| ७२/६ | ०.२४.०० | २.०० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून, आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : ०७/०४/२०२४ सही /-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं. १५, सनराईज अपार्टमेंट, कचेरी रोड, कर्जत-रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेल्या बागायती मिळकती मधील विद्यमान सहमालक श्री शशिकांत बापू चव्हाण व श्री हेमंत बापू चव्हाण यांच्या मालकीचे आणि प्रत्यक्ष ताजा वहिवाटीतील ०-०६-०० हे. आर क्षेत्र व त्यामधील घर मिळकत क्र. २८२८ या मिळकती खरेदी घेण्याचे निश्चीत केले आहे. सदर मिळकती निर्वेध मालकीहक्काच्या असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट क्र | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| २४६१ | ००-४९-६० | १८-९३ |

**सदर मिळकतीमधील विद्यमान सहमालक श्री शशिकांत बापू चव्हाण व श्री हेमंत बापू चव्हाण यांच्या मालकीचे आणि प्रत्यक्ष ताबा वहिवाटीतील ०-०६-०० हे.आर. बागायती क्षेत्र व त्यामधील ग्रुपग्रामपंचायत नागाव घर मिळकत क्रमांक २८२८, क्षेत्र १०२८ चौ. फुट अशा वर्णनाच्या मिळकती**

तरी, वरील मिळकतींबाबत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकती विकत घेणेचा व्यवहार स्नरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग **ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
दिनांक : ०६/०४/२०२४ 'गुरुकृपा' महर्षी कर्वे रोड
अलिबाग- रायगड
मोबा. नं. ९८५०४८६९४२

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे बामणोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली बिनशेती जमिन मिळकत व त्या अंतर्गत असणारी घर मिळकत श्री. महेश वामन तांडेल, राहणार मराठीशाळे समोर, बामणोली, ता.अलिबाग, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, त्याअंतर्गत असणाया घर मिळकतीसह सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तहेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| बामणोली, ता. अलिबाग. | १७७ | ५-०६-०० एकूण | ५०-६० |

सदर बिनशेती जमिन मिळकत व त्या अंतर्गत असणारी ग्रामपंचायत मान तर्फे झिराड कडील मालमत्ता क्र. १७५, क्षेत्र १७५.६५ चौ.मी. ह्या घर मिळकत.

अलिबाग,
दिनांक : ०७/०४/२०२४. सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदाराचे वकील

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मालकाचे नाव : रणजित शिवाजीराव शितोळे**
**मौजे: अष्टमी ता. रोहा जि. रायगड**

| मौजे | भु. मापन क्र. | भो.ग. वर्ग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|---|
| अष्टमी | ६२/२१४ | १ | ०.५६.४०<br>०.००.९० (पो.ख)<br>०.५७.३० | ६.९२ |

सदर वर वर्णन मिळकतीतील जाहिर नोटीसचा विषय आहे. अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा, हक्क, लिज, चार्ज, पोटगी, वहिवाट, (जाण्या-येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य ते कागदपत्रे पुराव्या सहीत सादर करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहित धरून आमचे आशिल व्यवहार पुर्ण करतील. व मागाहून कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे.

माणगांव सही/-
दिनांक :- ७/४/२०२४ **(ॲड. पी. एम. जाधव)**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत तिचे मालक श्री. बर्लिन ब्रुनो डिसोझा यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे - नालधे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| भुमापन क्र व उपविभाग/ प्लॉट क्रमांक | एकूण क्षेत्र | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७७/१ | ३-९५-०० आर चौ मीटर म्हणजेच ३९५ चौ. मी. | ३९-५० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०७/०४/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९ ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग

जा.क्र. : २७/२०१०

**(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ४६ (१) प्रमाणे नोटीस)**

प्रती,
१) श्री धनाजी श्रीरंग मेटकरी व सौ सोनाली धनाजी मेटकरी
मु. १०१, शिवालय रेसिडन्सी,
विद्यानगर, पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड
२) श्री म्हकाली उमाजी व्हळगुळे
मु. रा.जि.प. शाळेसमोर, भाल,
पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड
३) श्री सागर दिंगबर महानूर
मु. राजमळा, पो. थळ
ता. अलिबाग, जि. रायगड

महाशय,

१) जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी पतसंस्था आहे. या पतसंस्थेचा यापुढे सदर पतसंस्था असा उल्लेख केला आहे.

२) तुम्ही नं. १ ते ३ सभासद आहात.

३) तुम्ही नं. १ यांस फ्लॅट खरेदी करण्याकरिता रक्कम रू. २०,००,०००/- ची आवश्यकता होती. सबब तुम्ही सदर पतसंस्थेकडे रक्कम रू. २०,००,००० /- च्या कर्जाची मागणी केलीत तुम्ही नं. २ व ३ ने, नं. १ च्या कर्जास जामिनदार राहाण्यास मान्य व कबुल केलेत.

४) सदर पतसंस्थेच्या दि. ०९/०९/२०२० रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेतील ठराव क्र. ३ ब अन्वये तुम्ही नं. १ यांस रक्कम रू. २०,००,०००/- (रूपये वीस लाख मात्र) ७ वर्ष मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात आले. हे कर्ज तुम्ही दरमहाच्या रक्कम रू. ३९,०००/- ह्या हप्ताप्रमाणे परतफेड करावयाचे ठरले होते.

५) तुम्ही नं. १ यांस मंजूर करण्यात आलेले कर्ज हे मालमत्ता तारण कर्ज होते. सबब तुम्ही नं. १ ने तुमच्या संयुक्त मालकीची मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड व तुकडी रायगड वरसोली ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे नं. ५०, पो नं. २३ वरील वरसोली ग्रामपंचायतीचे दप्तरी २२/११ असा घर क्र असलेल्या शिवालय रेसीडन्सी या इमारतीतील पहिला मजल्यावरील फ्लॅट नं. १०१, क्षेत्र ६५३ चौ.फुट ही निवासी सदनिका तारण देण्याचे ठरले होते. ह्या फ्लॅट चा सदरचा फ्लॅट असा उल्लेख केला आहे.

६) दि. १६/०९/२०२० रोजी तुम्ही सदरचा फ्लॅट नोंदणीकृत गहाणखतांन्वये सदर पतसंस्थेस तारण दिलात. हे नोंदणीकृत गहाणखत सह दुय्यम निबंधक, अलिबाग वर्ग-२ यांच्या कार्यालयात अनु. क्र. १४६७/२०२० कडे नोंदविलेले आहे

७) त्यानंतर कर्जरोखा इ. आवश्यक त्या कागदपत्रांची तुम्ही सर्वांनी कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर तुम्ही नं. १ यांस कर्जाची उचल देण्यांत आली.

८) तुम्ही नं. १ ने तुमच्या कर्जखात्यात दरमहा रक्कम रू. ३९,०००/- चा भरणा केला नाहीत. दि. ३१/०१/२०२४ अखेरीस तुम्ही नं. १ कडून सदर पतसंस्थेस एकूण रक्कम रू. ३०,९७,३३५/- येणे आहे.

९) दि. ३१/०१/२०२४ पर्यंत तुम्ही नं. १ चे एकूण ३५.६२ इतके हप्ते थकविले आहेत, त्यामुळे तुमचे कर्ज खाते एन.पी. ओ झालेले आहे. तुम्ही जो मध्यम मुदत कर्जरोखा लिहून दिलेला आहे त्या कर्जरोख्यातील अटी व शर्थीनुसार तुम्ही नं. १ कडून ३ हप्ते येणे राहिल्यास सर्व रक्कमेची मागणी करण्याचा अधिकार सदर पतसंस्थेस आहे.

१०) दि. २१/०२/२०२४ रोजी झालेल्या सदर पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या सभेतील विषय क्र.७ वरील विषयावर चर्चा करताना सदर पतसंस्थेच्या कर्जरोख्यातील अटी व शर्थीचा तुम्ही भंग केल्याची संचालक मंडळाची खात्री झाली. त्यामुळे या सभेतील ठराव क्र. ७ (ब) प्रमाणे तुमच्याकडून येणे असलेल्या सर्व रक्कमेची मागणी करावी असे ठरले. तसेच ही मागणी नोटीस देण्याचे अधिकार मॅनेजर म्हणून मला देण्यात आले. तुम्ही नं. १ कडून सदर पतसंस्थेस येणे असलेल्या कर्जाच्या परतफेडीस तुम्ही नं. २ व ३ हे सुध्दा जबाबदार आहात.

११) तरी याद्वारे तुम्हाला असे कळविण्यांत येते की, ही नोटीस दिवसांच्या मुदतीत तुम्ही नं. १ कडून मिळाल्यापासुन ३१/०१/२०२४ रोजी येणे असलेली रक्कम रू.३०,९७,३३५/- व या रक्कमेची परतफेड होईपर्यंत दि. ०१/०२/२०२४ पासूनचे पुढील व्याज अशा सर्व रक्कमेचा न चुकता भरणा करावा. तसे न केल्यास तुमच्याविरूध्द तुम्ही नं. १ कडून येणे असलेल्या रक्कमेच्या वसुलीकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ९१/१०१ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच या कारवाईच्या सर्व खर्चाची व परिणामांची जबाबदारी तुमच्यावर राहील हे तुम्हांस कळावे.

सही/-
**व्यवस्थापक**
**जनसेवा नागरी सह. पतसंस्था मर्या. अलिबाग**

**(टीप:- श्री.म्हकाली उमाजी व्हळगुळे यांना नोटीसीची बजावणी झाली नाही. सबब नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.)**




# महायुतीच्या कार्यकर्त्यांचा श्रीरंग बारणे यांना विरोध

## कार्यकर्ते निवडणुकीपासून राहणार अलिप्त; पळसदरी ग्रामपंचायतीमधील कार्यकर्त्यांचा निर्णय

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेद्वार श्रीरंग बारणे यांना स्वकीयांच्या विरोधाला सामोरे जावे लागणार आहे असे दिसू लागले आहे. महायुतीत काम करण्यास पळसदरी ग्रामपंचायतीमधील कार्यकर्त्यांचा निर्णय घेऊन या लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या कार्यकर्त्यांनी बारणे यांना विरध केला आहे. महायुतीचे कार्यकर्ते निवडणुकीपासून अलिप्त राहणार आहेत.



पळसदरी ग्रामपंचायतीमधील काही गावात कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आ. महेंद्र थोरवे यांना विरोध आहे. या भागातील कार्यकर्त्यांची कोणतीही कामे आमदारानाकडून होत नसल्याने स्थानिक कार्यकर्ते नाराज आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणूकीमध्ये महायुतीवर बहिष्कार करणार असल्याचे पत्र पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील राष्ट्रवादी, शिवसेना पक्षाचे कार्यकर्त्यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेद्वार बारणे यांना पत्र लिहिले आहे.

ग्रामपंचायतीमध्ये सत्ताधारी असलेल्या शिवसेना पक्षाकडून काही गावामधील कार्यकर्त्यांना सापत्न वागणूक दिली जाते.

तालुक्यातील पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील स्थानिक ग्रामस्थ शेतकरी म्हणून गेले वर्षभर कल्पतरू एरिया प्रकल्पमध्ये स्थानिकांना रोजगार मिळावा यासाठी स्थानिक ग्रामस्थ उपोषण, आंदोलन, अर्ज, विनंत्या, बैठका करून झालेले आहे.

मात्र, महायुतीतील शिंदे गटाचे आमदार कामामुळे राजकीय भावनेने विरोध करीत आहेत. कंपनी प्रशासनावर दबाव आणून कोणत्याही प्रकारे काम मिळू नये अशी विरोधी भूमिका घेत आहेत.

आम्ही पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील प्रामुख्याने नांगुर्ले, तिघर येथिल कार्यकर्ते महायुतीचे उमेद्वार बारणे यांना मतदान न करण्याचा निर्णय महायुतीच्या कार्यकर्त्यांनी घेतला आहे. न्याय मिळत नाही तोपर्यंत महायुतीचे काम करणार नाही, असा पवित्रा येथील स्थानिक कार्यकर्त्यांनी घेतला आहे. त्यात कर्जत पंचायत समिती माजी सदस्य रवींद्र देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका सरचिटणीस राजेंद्र निगुडकर, कर्जत पंचायत समिती माजी सभापती राकेश मरले, ज्येष्ठ कार्यकर्ते अनिल देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महिला संघटक पूजा सुर्वे ,राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते भरत कदम, युवक तालुका सरचिटणीस रुपेश पवार आदी प्रमुख तसेच १०० हुन अधिक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# नाशिकवरून पुन्हा खलबत

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

नाशिकच्या जागेचा तिढा अजूनही सुटलेला नाही. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या अजितदादा गटाने नाशिकच्या जागेवर दावा केला आहे. नाशिकच्या जागेसाठी दिल्लीतूनच माझ्या नावाची चर्चा सुरू झाली आहे, असा दावा अजितदादा गटाचे नेते छगन भुजबळ यांनी केला आहे. त्यामुळे शिंदे गटाचे विद्यमान खा. हेमंत गोडसे यांचा नाशिकमधून पत्ता कट झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र, नाशिकची सीट मिळावी म्हणून गोडसे यांच्याकडून निकराचे प्रयत्न सुरू आहेत. आधी शक्तीप्रदर्शन केल्यानंतर गोडसे यांनी भेटीगाठीही सुरू केल्या. मुख्यमंत्री शिंदे यांचा पुन्हा गोडसे यांना भेटायला बोलावले त्यामुळे या भेटीत काय निर्णय होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तातडीने मुंबईला या असा निरोप मिळाल्यानंतर गोडसे हे मुंबईकडे रवाना झाले. त्यांच्यासोबत माजी सामाजिक न्याय मंत्री बबनराव घोलपही हे दोन्ही नेते मुख्यमंत्र्यांना भेटणार असून मुख्यमंत्र्यांशी नाशिकच्या जागेवरून चर्चा करणार आहेत. त्यामुळे नाशिकची जागा गोडसेंना मिळणार का? की गोडसे यांची समजूत काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी त्यांना बोलावलं? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माढ्याबाबत अपेक्षित निर्णय लवकरच

## धैर्यशील मोहिते-पाटील यांचे सुतोवाच

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

माढा लोकसभेच्या रणांगणात उतरण्यापूर्वीच युद्धभूमी तयार करण्याचे काम धैर्यशील मोहिते-पाटील यांच्याकडून सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी काल व आज माण व फलटण मतदारसंघाचा दौरा करत प्रमुख नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्या. या भेटीनंतर जनतेला अपेक्षित असलेला निर्णय लवकरच घेणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्यांचे हे विधान म्हणजे माढा मतदारसंघामध्ये तुतारी हाती घेणार असल्याचे संकेत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.



२०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीपासून फारकत घेत मोहिते-पाटील घराने भाजपची कास धरली. या निवडणुकीत त्यांनी भाजपचे उमेद्वार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचे नेटाने काम केले. त्यांच्या मताधिक्याच्या जोरावरच राष्ट्रवादीचे उमेद्वार संजय शिंदे यांचा पराभव झाला; परंतु, गेल्या पाच वर्षांत मोहिते-पाटील व रणजितसिंह यांच्यातील संबंध टोकाचे बिघडले. त्यामुळे त्यांना उमेद्वारी देण्यास मोहिते-पाटलांचा विरोध होता.

त्यातून भाजपची उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी धैर्यशील यांनी आपली प्रचार मोहीम सुरू केली होती. त्याला भाजपने साथ दिली नाही. त्यामुळे मोहिते-पाटील कार्यकर्त्यांनी तुतारी हातात घेण्याचा आग्रह केला आहे. त्या पार्श्वभूमीवर त्यांची ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याशी भेट झाली. या भेटीचा तपशील बाहेर आलेला नाही, तसेच उमेद्वारीबाबतही अद्याप काही जाहीर झालेले नाही.

पवार यांची भेट घेतल्यानंतर काल व आज धैर्यशील यांनी माढा मतदारसंघातील माण व फलटण या तालुक्यांत ठाण मांडले आहे. या दोन दिवसांत त्यांनी मतदारसंघातील प्रमुख नेत्यांची भेट घेऊन लढाईच्या सोंगट्या मांडण्यास सुरुवात केल्याचे दिसत आहे. काल त्यांनी शिवसेना (ठाकरे गट) नेते शेखर गोरे यांची त्यांच्या कुळकजाई येथील आर्यन फार्म हाऊसवर भेट घेतली. या वेळी फलटण बाजार समितीचे अध्यक्ष रघुनाथराजे नाईक-निंबाळकरही त्यांच्या सोबत होते. महाविकास आघाडीकडून लढले, तर महादेव जानकर यांना निवडून आणण्याची गॅरंटी गोरे यांनी घेतली होती; परंतु जानकरांनी महायुतीत जात परभणीची वाट धरल्यावर त्यांनी महाविकास आघाडीचा घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादीने आम्हाला गृहीत धरू नये, अशी भूमिका बदलली होती.

# भाजपाच्या वाढता दबावामुळे मुख्यमंत्री हतबल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बाळासाहेब ठाकरे यांची खरी शिवसेना ही आमचीच शिवसेना असल्याचा छातीठोकपणे दावा करणाऱ्या शिंदे गटाच्या शिवसेनेवर इतकी नामुष्की ओढवली जाईल असं शिवसेनेतील एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिंदेसोबत गेलेल्या खासदार, आमदारांना स्वप्नातही वाटलं नव्हतं. हिंगोलीत खा. हेमंत पाटील यांना शिंदे यांच्याकडून अधिकृत उमेदवारी जाहीर केल्यानंतर सुद्धा भाजपाच्या दबावामुळं त्यांची उमेदवारी मागे घेण्याची नामुष्की एकनाथ शिंदे यांच्यावर ओढवली आहे.



दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राखी बांधणाऱ्या यवतमाळ-वाशिमच्या विद्यमान खा. भावना गवळी यांचाही पत्ता कट करण्यात आला आहे. अजून लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातील अनेक जागांवर उमेद्वारांची घोषणा बाकी असताना, मुख्यमंत्री शिंदे यांच्यासाठी ही फार कठीण अवस्था झाली आहे. भाजपाच्या वाढत्या दबावाखाली ते पूर्णतः झुकले असून नाराज खासदारांना आणि नेत्यांना काय उत्तर द्यावं? हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे.

भाजपाचे कमळ चिन्हावर ३७० खासदार निवडून येतील असा आत्मविश्वासही भाजपाला आहे. परंतु, या ३७० च्या नादात सहयोगी पक्षाच्या विद्यमान खासदारांचा बळी जात आहे. याचीच प्रचिती महाराष्ट्रात आली आहे.

# राणे यांना तिसऱ्यांदा पराभूत व्हावं लागेल

## विनायक राऊत यांचे प्रतिपादन

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना तिसऱ्यांदा चितपट करण्याची संधी मला लाभणं हे माझं भाग्य समजतो, असे वक्तव्य ठाकरे गटाचे खा. विनायक राऊत यांनी केले आहे ते चिपळूणमध्ये बोलत होते. रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेद्वार खा. राऊत यांच्यासह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या (ठाकरे गट) स्थानिक नेत्यांची यावेळी उपस्थिती होती.



यावेळी बोलत असताना विनायक राऊत यांनी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्यावर जोरदार टोलेबाजी केली. या मेळाव्यानंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना विनायक राऊत म्हणाले की, आमच्यासमोर कोणीही येऊदेत, किमान अडीच लाखाच्या फरकाने त्याला आपटणार. तसेच महायुतीचा उमेदवार १२ तारखेपर्यंत ठरला तरी पुष्कळ आहे असा टोला राऊत यांनी लगावला.

किरण सामंत हे माझ्यासाठी आव्हानात्मक ठरले असते, नारायण राणे हे माझ्यासाठी आव्हान नाही. राणे यांना तिसऱ्यांदा चितपट करण्याची संधी मला लाभणं हे माझं भाग्य आहे. नारायण राणे यांना सलग तिसऱ्यांदा पराभूत व्हावं लागेल, असे भाकीतही यावेळी राऊत यांनी वर्तवले.

# श्रीकांत शिंदेची उमेदवारी जाहीर


**। ठाणे । वृत्तसंस्था ।**

कल्यामध्ये महायुतीचा उमेद्वार कोण असेल यावर कित्येक दिवस पडदाच होता. विद्यमान खा. श्रीकांत शिंदे यांनाच पुन्हा उमेदावरी मिळणार अशी शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांना आशा होती. पण भाजपच्या कार्यकर्त्यांना मात्र, ही जागा आपल्याला मिळावी अशी इच्छा होती. अखेर आज या जागेवरील पडदा उठला असून कल्याणमधील सस्पेन्स संपला. मुख्यमंत्री शिंदे यांचे पुत्र आणि विद्यमान खा. श्रीकांत शिंदे यांची उमेद्वारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यामुळे कल्याणमध्ये आता महायुतीचे श्रीकांत शिंदे व ठाकरे गटाच्या वैशाली दरेकर असा सामना रंगणार आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ७ एप्रिल ते १३ एप्रिल २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## रखडलेली कामे पूर्ण होतील



**मेष :** या राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता हा आठवडा नोकरीत चांगले यश मिळवून देईल. आरोग्य चांगले राहील. रखडलेली कामे मार्गी लागतील. मित्रांच्या भेटीगाठी होतील. कामात वरिष्ठांचे चांगले सहकार्य मिळेल. या आठवड्याचा शुभ रंग - पांढरा आहे. सुरुवातीपासूनच तुम्हाला चांगले यश मिळेल. रखडलेली कामे पूर्ण होतील. श्री गणेशाची पूजा करा. विद्यार्थ्यांसाठी हा आठवडा खूप चांगला आहे. रविवारपासून मंगळवार पर्यंतचा काळ थोडा संघर्षाचा आणि अडथळे निर्माण करणारा ठरु शकेल. मंगळवारनंतर व्यवसायात चांगले यश प्राप्त होईल. धार्मिक कार्य होतील. कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्याबद्दल जागरूक राहा. रखडलेली कामे मार्गी लागतील. उत्पन्नाचे, व्यापार वाढीचे नवे मार्ग उपलब्ध होतील. आरोग्य चांगले राहील. नोकरीत दिलेली जबाबदारी वेळेवर पूर्ण करा. नोकरी, व्यवसायातही प्रगती होईल. **महिलांना:** हा आठवडा तुमच्यासाठी प्रगतीशील आहे. कोणत्याही प्रकारे चुकीच्या कामांपासून दूर राहिल्यास आपल्या हिताचे राहील. वडिलोपार्जित संपत्तीमुळे आपला तणाव वाढण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक:** ८,९

## आत्मविश्वास वाढेल



**वृषभ :** या राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता या आठवड्यात करिअरमध्ये चढ-उतार येतील. ग्रहांच्या संक्रमणाच्या परिणामांचा स्वीकार करायला हवा. या दिवसांत बुधवार नंतर प्रत्येक कामात यश मिळेल. गुरुवार ते शनिवार या काळात पैशांची आवक होण्याची चिन्हे आहेत. या दिवसांत तुमचा आत्मविश्वास वाढेल. कामातील स्थितीत चांगली प्रगती होईल. व्यवसाय वाढविण्यासाठी अधिक चांगले प्रयत्न करण्यासाठी प्रयत्नशील राहा. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. व्यवसायात चांगला लाभ होईल. शनि महाराज या वेळी आपले नुकसान न करता तुम्हाला चांगला लाभ देतील. नोकरीत निष्काळजीपणाने वागू नका. तसेच व्यावसायिकांसाठी शुभ संधी उपलब्ध होईल. अन्नदान करा. आर्थिक प्रगतीमुळे आनंद होईल. या आठवड्याचा शुभ रंग-निळा आहे. या दिवसांत विद्यार्थ्यांना चांगले यश प्राप्त होईल. **महिलांना :** मंगळवारपर्यंतचा कालावधी थोडा संघर्षाचा आहे. वाहन खरेदी करण्याचा विचार कराल. मित्रांचे चांगले सहकार्य मिळेल. अन्नदान करा. **शुभदिनांक :** १०,११

## आरोग्याची काळजी घ्या




**मिथुन :** या राशीसाठी आपले ग्रहमान पाहता आप्तांशी गैरसमज होण्याची शक्यता अधिक आहे. प्रणयी जीवनात विशेष त्रास जाणवत नसला तरी सुरवातीच्या दोन दिवसात आपले संबंध मंदावण्याची शक्यता आहे. जर विवाहा विषयी निर्णय घ्यावयाचा असेल तर तो पुढील आठवड्यात मध्यानंतर घ्यावा. आठवड्याच्या शेवटच्या दिवसांत आपल्या संबंधातील सलोखा वाढेल. सध्या आपण कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी खर्च कराल परंतु त्यात यशप्राप्तीची अपेक्षा बाळगू नका. अनेक दिवसांपासून कोणाशी मतभेद झाले असल्यास ह्या वर्षी त्याचे सुखद निराकरण होऊ शकेल. विद्यार्थ्यांसाठी चालू आठवड्याची सुरवात चांगली असली तरी मध्यानंतर त्यांना मेहनत वाढवावी लागेल. एखादा विषय समजून घेण्यासाठी आपणास अधिक मेहनत करावी लागण्याची शक्यता आहे. **महिलांना :** या सप्ताहपर्यंत आपल्या मित्र-मंडळात वाढ होईल. आरोग्याच्या बाबतीत ह्या वर्षी अनेक चढ - उतार येतील असे दिसते. कुटुंबातील इतर महिलावर्गाशी सुद्धा क्षुल्लक कारणांवरून वाद होण्याची शक्यता दिसते. **शुभदिनांक :** १२,१३

## व्यवसायात प्रगती होईल



**कर्क :** या राशीधारकास या सप्ताहात आपण नवीन ओळखी वाढविण्यासाठी आपण अनेकदा व्यावसायिक स्नेहसंमेलन किंवा बैठका, किंवा कार्यशाळा आयोजित करण्याची किंवा त्यात सहभागी होण्याची शक्यता आहे. दीर्घकालीन गुंतवणुकीतून सुद्धा फायदा होऊ शकेल. हे दिवस आपल्यासाठी विविध आघाड्यांवर महत्वपूर्ण ठरेल. नोकरी - व्यवसायात प्रगती झाली तरी संपूर्ण कामात मुलभूत बदल करण्याचे विचार आपल्या मनात येतील. मात्र त्याची अंमलबजावणी करताना काळजी घ्यावी. ह्या वर्षात नवीन महिन्यापर्यंत कोणतेही बदल किंवा नवीन सुरवात करताना दीर्घकालीन विचार करा, तसेच इतरांवर विसंबून न राहता स्वतःच परिस्थितीचे आकलन करून पाऊल उचलावे. लोखंड, सिमेंट, अवजड मशिनरीसाठी लागणाऱ्या वस्तू किंवा त्यांच्याशी संबंधित सेवा, अवजड वाहनांशी संबंधित कार्यात ह्या दिवसात आपण उत्तम प्रगती साधू शकाल. **महिलांना :** आपले ध्येय साध्य करण्यासाठी आपण अपार कष्ट करू शकाल. कौटुंबिक संबंधात त्यातही विशेषतः मातेशी व्यवहार करताना सावध राहावे लागेल. **शुभदिनांक :** ७, ८

## फळ मिळण्याची आशा




**सिंह :** या राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. विद्यार्थी वर्ग आधीपासूनच जर अभ्यासाबाबतीत अधिक जागरूक राहिलात तर फायदा होऊ शकेल. आरोग्याच्या दृष्टिकोनातून सुरवात चांगली असली तरी ऋतुमानातील बदलाचा आरोग्याच्या बाबतीत हयगय न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. व्यावसायिक आघाडीवर काही आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागेल. ह्या दिवसांत शक्यतो शेअरची कामे, वायदे बाजार इत्यादींपासून दूर राहावे, अन्यथा मोठे नुकसान होऊ शकते. सुरवातीच्या दिवसात तांत्रिक कार्यात आपण उत्तम प्राप्ती करू शकाल. आठवड्याच्या मध्यानंतर आपल्या कामाच्या गतीस थोडी खीळ बसेल. सध्या आपणास मिळणाऱ्या लाभात थोडा विलंब झाला तरी उत्तरार्धात चांगले फळ मिळण्याची आशा आपण बाळगू शकता. **महिलांना :** ह्या दिवसांत दीर्घ पल्ल्याच्या प्रवासाचे आयोजन करू शकाल. ह्या वर्षात व्यावसायिक आघाडीवर आपले जाळे विस्तारण्यावर आपले लक्ष केंद्रित करू शकाल. **शुभदिनांक :** १०,१३

## आहारावर विशेष लक्ष द्या



**कन्या :** या राशीसाठी या सप्ताहात सुरवातीला हा साप्ताह आव्हाने, संघर्ष, मेहनत व यशाचे मिश्रण देणारे आहे. प्रणयी जीवनात आपल्याला वर्षभर काळजी घ्यावी लागणार आहे. अखेरच्या दिवसात आधीच्या तुलनेत परिस्थितीत सुधारणा झाली तरी कौटुंबिक संबंधात काही कटुता येण्याची शक्यता आहे. प्रेमसंबंधाच्या बाबतीत सतत अनिश्चितता जाणवेल. या दिवसांत प्रणयी जीवनात व भावनेच्या भरात कोणताही निर्णय न घेता थोडा व्यावहारिक दृष्टिकोन बाळगावा. आता सुरु झालेल्या संबंधाच्या भविष्या विषयी काही सांगणे अशक्यप्राय वाटत असल्याने नवीन व्यक्तीशी संबंध जुळवताना किंवा वैवाहिक जोडीदाराच्या शोधात आपली फसवणूक होण्याची शक्यता आहे. **महिलांना :** चालू परिस्थितीत कोणतेही नवीन संबंध न जुळवणे हितावह ठरेल. जे आधी पासूनच संबंधात आहेत त्यांना सुद्धा सध्या आपल्या जोडीदारास खुश ठेवण्यासाठी किंवा परस्पर आत्मीयता टिकविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. संभाव्य त्रास टाळण्यासाठी व्यायामातील नियमितता व आहारावर विशेष लक्ष द्यावे लागेल. **शुभदिनांक :** ९,१०

## वडिलधाऱ्यांचे मार्गदर्शन मिळेल




**तुळ :** तुळराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता सध्या आपले ज्यांच्याशी संबंध आहेत त्यांच्याबद्दल आपण अधिक भावनाशील होण्याची शक्यता आहे. या आठवड्यात आपल्या जीवनात प्रणयास अधिक महत्व असेल. ह्या दरम्यान आपण नवीन संबंधाची सुरवात करण्याचा किंवा असलेल्या संबंधास नवीन वळण देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्याची शक्यता आहे. ह्या वर्षात आपल्या जीवनात असे काही प्रसंग उद्भवतील की पैश्यापेक्षा संबंधास किती जास्त महत्व असते ह्याची आपणास जाणीव होईल. कारकिर्दीच्या बाबतीत वडिलधाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन आपण त्यांचे मन जिंकू शकाल. त्यांच्या मनात आपल्या विषयी आदर निर्माण होऊन त्यांचे आशीर्वाद जीवनात प्रगती साधण्यासाठी मदतरूप ठरतील. व्यावसायिक आघाडीवर या महिन्या दरम्यान चांगली संधी मिळण्याची अपेक्षा आपण बाळगू शकता. **महिलांना :** प्रणयी जीवनासाठी वर्षाच्या सुरवातीचे दिवस अनुकूल असून त्यात मध्यानंतर आपल्या प्रिय व्यक्तीस खुश ठेवण्यासाठी आपणास अधिक सक्रिय राहावे लागेल. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. **शुभदिनांक :** ११,१३

## वरिष्ठांचे उत्तम सहकार्य मिळेल




**वृश्चिक :** या कराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण सामाजिक व धार्मिक कार्यात सहभागी होऊ शकाल. हे वर्ष विद्यार्थ्यांसाठी सामान्य असल्याने त्यांना सुरवाती पासूनच नियोजनपूर्वक अभ्यास करावा लागेल. ह्या दिवसात आरोग्य मध्यम राहील. येणारा कालावधी आपल्यासाठी एकंदरीत चांगले आहे. आपणास प्रगतीच्या अनेक संधी मिळतील. व्यावसायिक आघाडीवर आपण मोठे ध्येय गाठू शकाल. ह्या वर्षी आपण प्रगतीसाठी नवीन ध्येय निर्धारित करून ते पूर्ण करण्याची व्यूहरचना आखण्याची शक्यता आहे. कामाप्रती अभिरुचीत व विचारसरणीत नाविन्याची अपेक्षा आपण बाळगू शकता. फेब्रुवारीनंतर कामाप्रती आपणास आळस वाटू लागला तरी आपला उत्साह जर कमी केला नाहीत तर त्यात विशेष फरक पडणार नाही. नोकरीत वरिष्ठांचे उत्तम सहकार्य मिळून नवीन संधी प्राप्त होऊ शकतील. **महिलांना :** नवीन काही करण्यास हरकत नसली तरी जर आपले कौशल्य व ज्ञान वृद्धीसाठी प्रयत्न केल्यास भविष्यात कारकिर्दीत खूप मोठा फायदा होऊ शकेल. व्यक्तिगत आयुष्यात अनेक चढ-उतार येतील परंतु समाधानी वृत्ती बाळगल्यास संबंधातील समतोल आपण साधू शकाल. **शुभदिनांक :** ८,११,

## कामातील उत्साह वाढेल




**धनु :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्याला घरातील संबंधात एकमेकांवर विश्वास ठेवावा लागेल, इतकेच नव्हे तर कधीकधी नमते सुद्धा घ्यावे लागेल. सुरवातीस अनावश्यक किंवा चैनीसाठी खर्च होण्याची शक्यता आहे. विशेषतः भिन्नलिंगी संबंधात आपल्या जोडीदारास अधिक वेळ द्यावा लागेल तसेच त्यांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न सुद्धा करावा लागेल. हळूहळू नंतर घरगुती संबंधात सलोखा राहील. व्यावसायिक आघाडीवर भागीदारी कार्ये संथ गतीने मार्गक्रमण करण्याची शक्यता आहे. करार करण्यात कदाचित विलंब होऊ शकतो. आठवड्याच्या शेवटी आपली प्राप्ती संथ गतीने होण्याची शक्यता असल्याने आपणास आवश्यक खर्चाची तरतूद अगोदरपासूनच करून ठेवावी लागेल. पैसे जेथून येणार असतील तेथून येण्यास विलंब होऊ शकतो. नोकरी करणाऱ्यांना कष्ट करण्याची तयारी ठेवावी लागेल. **महिलांना :** आपला कामातील उत्साह वाढू शकेल असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. व्यावसायिकांना इतरांवर अवलंबून राहून केलेल्या कार्यात पश्चातापाची वेळ येण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक :** ७,१२

## आयुष्यात चढ-उतार येतील




**मकर :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता अति खर्च करताना आपल्या मर्यादित प्राप्तीचा विचार करूनच खर्च करावा. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारापासून तब्येत सांभाळा. हे दिवस आपल्यासाठी मिश्रफलदायी आहे. सतत चढ-उताराचे वातावरण राहिल्याने आपणास प्रत्येक क्षेत्रात समतोल साधून मार्गक्रमण करावे लागेल. कामात आपणास नीरसता किंवा थकवा जाणवेल. मागील अनेक दिवसांपासून आपले जीवनचक्र संथ गतीने चालत असल्याच्या आपल्या तक्रारीसह आपण मार्गक्रमण करत आलात. सुरवातीस ही तक्रार राहिली तरी आठवडा संपताना त्यात सुधारणा होऊ लागेल. आपले विचार सकारात्मक होऊ लागतील. मात्र, मध्या नंतर प्राप्तीची गती संथ झाल्याने आपल्या स्थितीत बदल होईल. **महिलांना :** एकूणच मानसिक त्रास तर राहणार आहे. अशावेळी मनोबल दृढ ठेवून आपणास कोणत्याही परिस्थितीस सामोरे जाण्यास सज्ज राहावे लागेल. **शुभदिनांक :** ९,११

## गृहसौख्य लाभेल



**कुंभ :** या राशी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता व्यावसायिक आघाडीवर आपण उत्तम प्रगती साधू शकाल व बहुतांश वेळा आपली कार्ये प्रगतिलक्षीच असतील. साप्ताहाच्या अखेरच्या दिवसात भागीदारी कार्यात काळजी घ्यावी. व्यक्तिगत व व्यावसायिक जीवनात प्रियव्यक्तीचा सहवास व सहकार्य मिळवू शकाल. बहुतेक वेळा प्रियव्यक्तीशी किंवा वैवाहिक जोडीदाराशी सलोखा राहील. त्या दरम्यान संबंधांचे उत्तम गृहसौख्य लाभेल. आर्थिक बाबतीत सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. साप्ताहाच्या अखेरीस स्थितीत थोडी सुधारणा झाली तरी खर्चावर नियंत्रण न ठेवल्यास इतरांकडून आर्थिक मदत घ्यावी लागेल. विशेषतः आपल्या प्राप्तीत अनिश्चितता राहिल्याने खर्चाचे पूर्व नियोजन करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांसाठी हे वर्ष उत्तम असले तरी भविष्यातील शिक्षणासाठी प्रवेश घेण्याच्या कार्याच्या किंवा वाटाघाटीच्या दरम्यान काळजी घ्यावी लागेल. **महिलांना :** आरोग्यास विशेष त्रास होणार नसला तरी नाक - कान - घसा ह्यांच्याशी संबंधित त्रास होण्याची शक्यता आहे. घरघूती संबंध उत्तम राहतील. **शुभदिनांक :** ८,१३.

## आत्मविश्वास वाढेल



**मीन :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपली अपूर्ण राहिलेली कामे आपण पूर्ण करू शकाल. प्रलंबित कामे पूर्ण झाल्याने आपणास नवीन आयोजनाचा मार्ग सापडेल. आपण मागील काही दिवसांपासून कमी बोलत आहात किंवा संपर्क सुद्धा पूर्वीच्या मानाने कमी करत आहात. सुरवातीस हि स्थिती अशीच राहील, नंतर आठवड्याच्या मध्यापासून त्यात सुधारणा होऊ शकते. विशेषतः लोकांच्या भेटीगाठी किंवा इतरांशी चर्चा वाढतील. संपर्काची नवीन साधने व सामाजिक माध्यमात आपण अधिक सक्रिय राहाल. मात्र, आपल्या शब्दांचा चुकीचा अर्थ काढला जाणार नाही ह्याची काळजी आपणास घ्यावी लागेल, अन्यथा आपल्या संबंधात कटुता निर्माण होऊ शकते. आपणास अनेकदा वैभवी जीवनशैलीचा व महागड्या वस्तू खरेदी करण्याचा मोह होईल. नकारात्मकते कडून आपण सकारात्मकतेकडे मार्गक्रमण कराल. **महिलांना :** प्रत्येक कार्यात व जीवनाविषयी आपला आत्मविश्वास वाढेल. मात्र अति आत्मविश्वास बाळगू नका, अन्यथा अडचणीत सापडावे लागेल. **शुभदिनांक :** ९,१२.

# पाणी पाणी रे....!!.

**माणसाला विविध गरजा पूर्ण करण्यासाठी पाण्याची गरज भासते. मोठ्या प्रमाणवर पाणी आपल्याला पावसामुळे मिळते आणि नंतर ते जलस्त्रोतांच्या माध्यमातून तेच पाणी मानवाला मिळते. पण आजचे पाण्याचे चित्र पहिले तर हेच जलस्त्रोत कोरडे पडताना दिसत आहेत. त्यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणावर टंचाई भासत आहे. दैनंदिन जीवनात पाण्याला मोलाचे महत्व आहे. पृथ्वीतलावर अस्तित्वात असणारी सजीवसृष्टी ही पाण्यामुळेच अस्तित्वात आहे. मानवी जीवनाचा जगण्याचा आधार हे पाणी आहे. रोज विविध मार्गांनी पाण्याचा अपव्यय होत असतो पाणी वाया जात असते. हेच पाणी वाया जाऊ नये यासाठी उपाययोजना आहेत. या उपाययोजना राबवण्यासाठी आपल्याला आपल्या दैनंदिन आयुष्यात विशेष बदल घडवून आणण्याची गरज आहे, हे आपण सगळेच जाणतो.**



काही दिवसांपूर्वी मी लोअर परेलच्या स्टेशनच्या जिन्यावरून खाली उतरत असताना माझं लक्ष एका भिंतीवर लिहिलेल्या कल्पक वाक्याकडे गेले. त्या ठिकाणी एक सुंदर वाक्य लिहिले होते.. ..

**पाणी येतं नळातून**
**नाही आले तर येते**
**डोळ्यांतून...!!**

**कोकणस्पंदन**
**धनंजय शेट्ये**

अगदी खरं आहे. पाणी हेच जीवन आहे पाणी नसेल तर ... कारण एक दिवस जरी घरी पाणी आले नाही तर गृहिणींची काय अवस्था होत असेल? त्यांच्या डोळ्यात अक्षरशः पाणी येते. कल्पनाच करवत नाही. आपण पाण्याचा अपव्यय टाळला पाहिजे. पाण्याचा सांभाळून जपून वापर केला पाहिजे. प्रतिदिन एका माणसाला अंदाजे ४० लिटर पाणी लागते. पण माणसांच्या निष्काळजीपणामुळे पाण्याचा प्रचंड अपव्यय होताना दिसत आहे. पिण्याचे वाया जाता कामा नये. गाड्या धुण्यासाठी बोअरवेलचे पाणी वापरावे. कारण कित्येक लोकांना हंडाभर पाण्यासाठी वणवण पायपीट करावी लागते. गतवर्षी आपण बातम्यांमध्ये पाहिले असेल. काही लोक लांब पल्ल्याच्या रेल्वे गाडीतील टॉयलेटमधील पाणी घेऊन जात होते. हे सर्व पाहून मनात धस्स व्हायचं. पाणीच नसेल तर आपली काय अवस्था होईल? आपल्या घरची लिकेज असलेली पाईपलाइन वेळीच बदलून घेतली पाहिजे. पाण्याचा थेंब न् थेंब वाचविला पाहिजे. मोबाईल, इंटरनेट, वाहने या गोष्टी एकवेळ नसल्या तरी आपण जिवंत राहू शकू पण पाणी नसेल तर आपण जगूच शकत नाही. पाण्याचे महत्त्व वेळोवेळी अबालवृद्ध अशा सर्वांच्या लक्षात आले पाहिजे. पाणी वाचविण्यासाठी जनजागृती करणेही तितकेच गरजेचे असते आणि यांची सुरुवात ही आपल्यापासूनच करायला हवी. आपण गळके नळ वेळीच दुरुस्त केले पाहिजेत. अलिकडच्या काळात मार्च-एप्रिल-मे या महिन्यात पाण्याच्या कमतरतेची बिकट अवस्था सर्वच भागात अनुभवायला मिळते. खेडोपाडी पाच सहा किलोमीटर दूर अशा अंतरावरील पाण्यासाठी हंडा कळशीने पायपीट करणाऱ्या बायका मुलं पाहिलं की, मन व्याकूळ होऊन जातं. पिण्याच्या पाण्यासाठी एवढा मोठा संघर्ष करावा लागतो ही गोष्ट मनाला खंत निर्माण करणारी आहे.

शालेय विद्यार्थी शाळेत जाताना पाण्याच्या बाटल्या भरुन पाणी घेऊन जातात. उरलेले पाणी फेकून देतात. त्यांनाही नित्यनेमाने पाणी वाचविण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. काही गृहिणी घरातले शिल्लक राहिलेले पाणी निळे पाणी म्हणून फेकून देतात. खरंतर पाणी शिळे ताजे असे काही नसतेच. पाऊस जून ते सप्टेंबर महिन्यात पडतो ते पाणी वर्षभर वापरले जाते. त्यात शिळे ताजे कुठे काय समजायचे? त्यामुळे घरातील कालचे पाणी दुसऱ्या दिवशी शिळे समजून फेकून देऊ नये. तासन्तास ठेवलेले उघडे नळ वेळेपूरतेच उघडावेत. शहरे, उपनगरे दिवसेंदिवस वाढत चालली आहेत. वाढत्या शहरीकरणामुळे पाण्याची प्रचंड कमतरता भासत आहे. भ्रष्टाचारी लोकांमुळे बेकायदा बांधकाम वाढत चालली आहेत. पाण्याच्या अपुऱ्या सुविधा यामुळे शहरे बकाल बनत चालली आहेत. मुंबई शहरानजीक दिवा, नालासोपारा, वसई, विरार यांसारख्या उपनगरात पिण्याच्या पाण्याची भयानक अवस्था आहे. अनधिकृत बांधकाम त्यामुळे तिथे राहणाऱ्या मध्यम वर्गीय सामान्य माणसांचे पिण्याच्या पाण्यासाठीची धडपड पाहाता डोळ्यात अश्रू दाटून येतात. दिवा शहरात तर दुपारी दोन वाजल्यापासूनच हंडा, कळशी, प्लास्टिकच्या बादल्या तेलाची रिकामी कॅन घेऊन अबालवृद्ध महिला पुरुष, लहानमुले धावपळ करताना दिसतात. एवढी धावपळ करुन तरी त्यांना पाणी मिळते का हाही प्रश्नच आहे. नालासोपारा, विरार, वसई भागात पिण्याच्या पाण्यासाठी केविलवाणी धडपड आहे. तर सर्रासपणे टँकरनेच पाणी घ्यावे लागते. विकत घेतलेले पाणी तरी शुद्ध असते का? पाणी कुठुन भरून आणले जाते देव जाणो! बोअरवेलचे खारे पाणीही तिथले लोक नाईलाजाने आंघोळीसाठी, कपडे, भांडी धुण्यासाठी लोक वापरतात. जणू समुद्राचेच पाणी भासावे असा खारटपणा त्या बोअरवेलच्या पाण्यात आढळतो. उपनगरात राहणारी मध्यमवर्गीय माणसं सगळ्याच गोष्टींची तरतुद करीत असतात. मग त्यांच्या पाण्याचा हा बिकट प्रश्न कधी सुटेल का? आशावादी आहेत पण भ्रष्टाचारी शासनव्यवस्था आशावाद अक्षरशः धुळीला मिळवत आहे. अशी बिकट परिस्थिती पाण्याच्या प्रश्नाबाबत होत चालली आहे. पुढील आणखी काही वर्षांनी अतिभयंकर अवस्था निर्माण होईल. या गोष्टीला पूर्णतः मानवच जबाबदार असेल. निसर्ग भरभरून काही देत आहे, निसर्गाच्या औदार्याला सीमा नाही आणि माणसांच्या निष्काळजीपणालाही! मानव अतिशय निष्काळजीपणे वागत आहे. वाढते औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे बकाल वस्ती अवाच्या सव्वा वाढत चालली आहे. मग वाढत्या शहरीकरणामुळे पाण्याची समस्या उद्भवत आहे. मग पाणी वाचविण्यासाठी काहीच होऊ शकत नाही का? तर आपण खूप काही करु शकतो. वारेमाप होणारी वृक्षतोड थांबवली पाहिजे. पावसाचे प्रमाण वाढण्यासाठी झाडेच महत्वाची भूमिका बजावतात. शिवाय जमिनीची होणारी धूप ही थांबवतात. 'पाणी अडवा पाणी जिरवा' मोहिमेला सुरुवात केली पाहिजे. गावोगावी या मोहिमेसाठी जनजागृती करणे गरजेचे आहे. माणसांची मानसिकता बदलली पाहिजे.

पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांनी जागरूक व्हायला हवे.खेडोपाडी उन्हाळ्यात विहिरीचं आटलेल्या असतात. पूर्वी त्याच विहिरींचे पाणी टिकायचे, वर्षभर पुरवायचे. मग आता असं काय झालं? याच उत्तर म्हणजे मानवानेच आपल्या पायावर दगड मारुन घेतला आहे. बोअरवेलचे प्रमाण वाढत चालल्याने भुगर्भातील जलसाठे आटत चालले आहे, शिवाय पर्यावरण विरोधी मानवी अतिक्रमण हे जलस्रोत उपसून काढत आहे. मानवाच्या राक्षसी आकांक्षेने पर्यावरणाचा विध्वंस केला आहे. असाच पर्यावरणाचा नाश जर मानव करत राहिल्यास एक दिवस आपलाही घात करुन घेणार आहे. पर्यावरण संतुलित करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करायला हवेत तर आपल्याला जीवन जगायला पाणी उपलब्ध होईल. अन्यथा पाण्यावाचून तडफडून मरण येण्याचा दिवस फार दूर नाही. **

**मोहोर**

***शेतकरी कामगार पक्षाच्या झुंजार, लढवय्या नेत्या, अभ्यासू व्यक्तिमत्त्व, भाषा प्रभुत्व, शेकापची मुलुखमैदानी तोफ म्हणून ज्यांचा गौरव व्हायचा, त्या मीनाक्षी पाटील यांनी आपल्या अभ्यासू वृत्तीने संपूर्ण महाराष्ट्रात एक वेगळीच ओळख निर्माण केली होती. राजकीय, सामाजिक, पत्रकारीता व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा एक वेगळा दबदबा होता. दहा हजारामध्ये एक असलेल्या वक्त्या म्हणून त्या होत्या. त्यांच्या वक्तृत्वाची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात आजही आहे.***

# स्व.मीनाक्षीताई पाटील : विधिमंडळातील कर्तव्यनिष्ठ लोकप्रतिनिधी

**प्रा.महेश बिऱ्हाडे**

ॲड. दत्ता पाटील महाराष्ट्र विधानसभेत १९९१ ते १९९५ या काळात त्यांची आमदारकीची शेवटची टर्म भूषवत होते. त्यावेळेस त्यांची विधीमंडळाच्या ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल श्री. दि. श्री. चव्हाण यांची नेहमी भेट होत असे त्यावेळेस सांगितले की, मी आता तुम्हाला त्रास देण्यास येणार नाही माझी ही शेवटची टर्म आहे. पुढच्या वेळेस माझी पुतणी मीनाक्षी पाटील हिला मी आमदार करणार आहे. तिला मी तुमच्याकडे आणीन, ती चांगली तयार होईल. तिला मदत करा. ॲड. दत्ता पाटील यांनी श्री. चव्हाण यांना सांगितल्या व त्याच्या म्हणण्याप्रमाणे १९९५ च्या विधानसभेच्या निवडणुकीचे तिकीट शेतकरी कामगार पक्षाने मीनाक्षीताईंना दिले. व प्रचंड मतांनी त्या अलिबाग उरण मतदार संघातून विधानसभेवर निवडून आल्या. मतदार संघातून विधानसभेवर निवडून आल्या. रायगड जिल्हा परिषद नावाच्या विद्यापीठात आणि त्या विद्याठाचे कुलगुरु प्रभाकर पाटील यांच्या तालमीत तयार झालेल्या ताई, रायगड जिल्हा परिषदेतील विरोधी पक्ष नेत्या म्हणून असलेल्या अनुभव, ॲड. दत्ता पाटलांचे मार्गदर्शन या सर्वांमुळे निवडून आलेल्या मीनाक्षीताईंनी दि. २२ मार्च १९९५ रोजी जय जवान, जय किसान हे घोषवाक्य वापरुन, उतणार नाही, मातणार नाही घेतला वसा टाकणार नाही, या आलिबागच्या जनतेला दिलेल्या शब्दाची जाण ठेवून सभागृहाच्या सदस्यपदाची शपथ घेतली. या प्रसंगी गांभिर्याने घेतलेल्या शपथेमध्ये जाणिवपूर्वक उच्चारलेल्या शब्दांमुळे आपण कोणाचे प्रतिनिधीत्व करणार आहोत, कोणाच्या समस्यांवर अडचणीवर आवाज उठवणार आहोत.

याची जणू चुणूकच त्यांनी दाखविली होती. त्यांची खरी ओळख सभागृहाला पटली ती दि. ३ एप्रिल १९९५ रोजी. राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या ठरावावरील पहिलेच भाषण त्यांनी सभागृहामध्ये केले. या पहिल्याच भाषणात त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. कोकणाचे प्रतिनिधीत्व करत असल्याचे सांगत कोकणातील माणसाला मुंबईत चाकरी करावी लागते. या कोकणातील बेरोजगारांना प्रशिक्षण दिले तर कोकणप्रांत राष्ट्रीय उत्पन्नात भर घालू शकेल. कोकणातील बंदरांमधील गाळ काढून जलवाहतुकीला प्राधान्य देण्याची मागणी केली.कोकणातील ६७ हजार हेक्टर जमीन खार जमीन असून त्यात सुधारणा केली तर मत्स्योत्पादनाबरोबरच सामाजिक वनीकरण देखील होऊ शकते. या सर्व घटकांची दखल मात्र, मा. राज्यपालांच्या भाषणात नाही. शिवाय शासन खारजमिनी संदर्भात ती नापीक कशी जाईल यासाठीच प्रयत्न करते की काय? अशी शंका व्यक्त करत आपले पहिलेच भाषण कोकणावरील अन्यायाचे व विकासाची दिशा दाखविणारे होते. अशी अनेकांची प्रतिक्रीया मीनाक्षीताईंनी मिळवली होती. त्यानंतर जोपर्यंत मीनाक्षीताई सभागृहात आहेत. तोपर्यंत एकही अधिवेशन असे झाले नाही. ज्यामध्ये त्यांची लालतोफ धडाडली नाही. अधिवेशनामध्ये ताईंनी राज्यातील, रायगडातील वीज टंचाई त्यामुळे अडचणीत आलेले शेतकरी, उद्योजक कामगार व ग्रामस्थांना विजेपासून वंचित रहावे लागते. त्यावर उपाय योजनांची मागणी केली. केवळ अलिबाग, रायगडच्याच नव्हे त्यांच्या किरकिर्दीत पुणे जिल्ह्यात जुन्नर तालुक्यातील धरणग्रस्त / प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाच्या प्रसंगी शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याची मागणी, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील कुपोषण, अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यामध्ये झालेल्या अपघातग्रस्तांचा मांडलेला प्रश्न, बीड जिल्ह्यातील माजलगांव नगरपालिका क्षेत्रात नागरिकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रश्न, सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ येथील शिक्षकाने विद्यार्थीनीवर केलेल्या बलात्काराचा मुद्दा उपस्थित केला. नगर जिल्हयातील प्रवरा नदीवरील कोल्हापूर टाईप बंधारे खचल्याने झालेले शेतकऱ्यांचे नुकसान, शहापूर तालुक्यातील इंदीरा आवास योजनेअंतर्गत झालेल्या बांधकामाबद्दल प्रश्न, चर्चगेट रेल्वे स्थानकाला रायगडचे सुपुत्र चिंतामणराव देषमुख यांचे नाव देण्यासाठी मांडलेला अशासकीय ठराव. रत्नागिरी जिल्ह्यातील बेकायदेशीररित्या होणारी मच्छिमारी बंद करण्याची लक्षवेधी सूचना, गुहागर येथे मत्स्य व्यवसाय केंद्र स्थापन करण्यासंबधीची चर्चा, मालवण वेंगुर्ला येथील मच्छिमारीमध्ये होणारी घट, मुंबईच्या नॅरलॅक पेन्ट कंपनीमध्ये झालेला कामगारांवरील अन्याय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात रेडी गावात इस्पात कंपनीने टाकलेल्या रासायनिक मालामुळे झालेले प्रदुषण अशा अनेक समस्यांवर ताईंनी वेळोवेळी आवाज उठविला. त्यासाठी काही तरी संसदीय आयुध वापरले. वरील सर्व बाबी या नमुन्यादाखल आहेत.



कोकणतील साबरकुंडधरणासंदर्भात सभागृहात चर्चा घडवून आणून ही मागणी सभागृहाचे कित्येक तास खर्च करून धसास लावली. अशक्यप्राय बाब शक्य करून दाखविली अलिबागमधील चेंढरे ग्रामपंचायतीस स्वतंत्र दर्जा मिळवून देण्याचा प्रश्न असो की रांजणखार डावली येथील सागरी धूपप्रतिबंधक बंधारा असो, बीडवागळे येथील पाझर तलावाचे अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबतचा मुद्दा, कर्जत तालुक्यातील पाली भुतिवली येथील धरणग्रस्तांना मिळवून दिलेला न्याय, अलिबाग तालुक्यातील चक्रीवादळामुळे झालेल्या घरांच्या नुकसानीबाबत व विकारांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न, डहाणू येथील आश्रमशाळेच्या गैरव्यवहाराबाबत मांडलेली व्यथा या अशा कितीतरी प्रश्नांच्या बाबतीत मीनाक्षीताईंनी विधानसभा दणाणून सोडली. अनेक मार्गांनी संसदीय आयुधांचा म्हणजे चर्चा, प्रश्न, लक्षवेधी सूचना, अशासकीय ठराव मागण्या कपात सूचना, भाषणे, समित्यांवरील कार्य अनेक शस्त्रांचा वापर मोठ्या चातुर्याने करून अलिबाग रायगड पर्यायाने महाराष्ट्राच्या जनतेचे दुःख हलके केले.

जनतेच्या जीवनाशी संबंधीत बाबींची सोडवणूक करण्यासाठी विविध खात्यांमध्ये खर्चासाठी पुरेशा तरतुद असणे आवश्यक असते. त्यासाठी सभागृहातील अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा, खातेवार अनुदानाच्या मागण्या पुरक मागण्या, राज्यपालांच्या अभिभाषणवरील चर्चा यासारख्या माध्यमातूनदेखिल मीनाक्षीताईंनी सरकारला वेळोवेळी धारेवर धरले. जनतेच्या मागण्यांची पुर्तता करणे हे जबाबदार लोकप्रतिधीचे कर्तव्य असते. त्यांनी तेच केले आहे. मीनाक्षीताईंना आगामी काळात मत्स्य व बंदर विकास खात्याचे राज्यमंत्रीपद शेतकरी कामगार पक्षाच्या कोट्यातून मिळाले. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी कोकणातील बंदरामधील गाळ काढण्याची योजना महाराष्ट्रात प्रथमतः राबवून जलवाहतुकीला प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर विदर्भातील स्थानिक मच्छिमार व कोकणातील तळी स्थानिक मच्छिमारांसाठी खुली करावीत असे त्यांना वाटत होते जेणेकरुन मच्छिमार व्यवसायिकांना उपजिविकेचे साधन उपलब्ध होईल. परंतु त्या खात्याच्या आधिकारी त्यास विरोध होता, या अधिकारी यांनी तशीच टिपण्णी करुन त्यांच्यासमोर सहीसाठी सादर केली. परंतु, ताईंनी त्यावर सही न करता सचिवांना बोलावले व सांगितले अशाप्रकारची टिपण्णी देऊन गोरगरीब मच्छिमारांच्यापोटावर पाय आणून त्यांच्या तोंडातील घास हिरावणे बरे नाही. मच्छिमारांसाठी तळी खुली करावीत या मताची मी आहे. त्या दृष्टीने नवी टिपण्णी करण्यास ठणकावून सांगितले. तेव्हा तो प्रश्नमार्गी लागून विदर्भातील शेकडो मच्छिमारांना उपजिवीकेचे साधन मिळाले. मंत्रिपदाच्या कारकिर्दीतील अत्यंत महित्वाचे कार्य म्हणजे मच्छिमारांसाठी मासळी उतरविण्यासाठी जे लँडिंग सेंटर असते ते फक्त मिरकरवाडा-रत्नागिरी येथे होते त्यामुळे मच्छिमारांचे वेळ, बर्फ व डिझेल हे सगळे वाया जाई.

खार बंदिस्तीच्या संदर्भातील कामेदेखील मोठ्या प्रमाणात केली दारुबंदीच्या संदर्भातदेखील योग्य पावले उचलली आणखी एक महत्वपूर्ण कार्य म्हणजे २०० कोटी रुपये खर्चाचा आलिबागचा कायापालट करणारा प्रकल्प मंजूर करुन घेऊन अलिबाग चेहरामोहरा बदलला, घारापूरी बेटावरी मुलभूत समस्यांबाबत वाचा फोडली व त्या संदर्भात संबधीत मंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्याकडून आश्वासन मिळवले. मीनाक्षीताईंच्या विधानसभेतील वक्तृत्वामुळे महाराष्ट्राची शान वाढलेली आहे. शिपायांपासून ते मुख्यमंत्र्यांपर्यत सर्वांनी ताईंच्या वक्तृत्वाबद्दल सर्वांनी गौरवोद्गार काढले आहेत. मीनाक्षीताईंचे विधानसभेतील सर्वात मोठे कार्य म्हणजे त्यांनी महाराष्ट्राच्या विधानसभेला पर्यायाने लोकशाहीला कलंकित होण्यापासून वाचविले. २००९ महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक झाली या निवडणुकीत मराठी अस्मितेचा प्रश्न घेऊन मनसे ने निवडणुका लढविल्या निवडणुकीनंतर जेव्हा विधानसभेत सदस्यत्वाची शपथ घेण्याचा प्रसंग आला तेव्हा मनसे आमदारांनी शपथ मराठीतच घेतली पाहिजे असा आग्रह धरला. समाजवादी पक्षाचे अबू आझमी यांनी मात्र हिंदीतून शपथ घेताच जो प्रसंग घडला. त्यावेळेस मनसेचे आमदार आझमीकडे चाल करून येत होते. दुसरीकडे अबू आझमीदेखील चिडले होते. अशा प्रसंगी विधानसभेत मारामारीही होते की काय? अशी भिती प्रत्येकाला वाटली तेव्हा मीनाक्षीताईंनी पुढे होऊन अबु आझमींचे अक्षरशः रक्षण करून महाराष्ट्र विधानसभेला कलंकित होण्यापासून वाचविलेच पण लोकशाहीलादेखिल वाचविले. अशा कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी आज आपल्यात नाहीत. त्यांची उणीव कायमच जनतेला जाणवत राहिल यात शंका नाही. अशा आमच्या लाडक्या बेबीताई अर्थात स्व.मीनाक्षी ताई पाटील यांना त्रिवार लाल सलाम !**

# 'रेतीवाला नवऱ्याची होडी गाळात'

कोकण किनारपट्टीवर निसर्गाचा समतोल राखणारा हजारो बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणारा सागरपुत्रांचा पारंपरिक 'रेती' व्यवसाय सध्या चांगलाच अडचणीमध्ये सापडलाय. ज्यांना समुद्राच माहीत नाही त्यांनी रेती व्यवसाय करणाऱ्यांना बदनाम केले आहे. रेती सम्राट, रेती चोर, रेती माफीया ठरवून या पारंपरिक व्यवसायातून इथल्या सागरपुत्रांना कधी हद्दपार केले ते कळले सुध्दा नाही.

दिसाला तो कसा पण दिस! मना लगीन कराव पायजे रेतीवाला नवरा पायजे या कृणाल मुझीकच्या गाण्याने मागच्या दहा पंधरा वर्षापासून अनेकांच्या हळदी, मांडव आणि वराती गाजवल्या. परंतु, त्या गाण्याच्या मागची मातृसत्ताक संस्कृती कोणाच्याही लक्षात आली नाही. दिसायला जरी सुंदर नसला तरी चालेल पण त्याचा रेतीचा व्यवसाय हा पुरक व्यवसाय आहे. म्हणून रेतीवाल्या नवऱ्याची स्वप्ने पाहणाऱ्या आमच्या ताईच्या नवऱ्याच्या 'वराचा घोडा' गावच्या वेशीबाहेरच निसर्गाच्या ऱ्हासाचे कारण देत अडकवला हे इथल्या सागरपुत्रांना कळलेच नाही.



छत्रपती शिवाजी महाराजांनी समुद्रावर किल्ले बांधून जागतिक व्यापार केला. ज्याचे आरमार त्याचाच समुद्र या वाक्यातच समुद्राची मालकीचा अधिकार छत्रपती शिवाजी महाराजांनी इथल्या सागरपुत्रांना दिला. नद्या, खाडया, समुद्रातील रेती व्यवसाय हा निसर्गाला हानीकारक नसून तो निसर्गाचा समतोल राखत आहे.

समुद्रालगतच्या खाड्या, नद्या खोल झाल्यामुळे पाण्याची पातळी वाढून तेथे मोठे मासे राहतात. तसेच कादंळवनाच्या मुळाशी मासे अंडी घालतात. याच मासळीच्या जीवावर इथले आगरी, कोळी, भंडारी सागरपुत्र मासेमारी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत.देशाच्या विकासाचा आर्थिक स्त्रोत म्हणून मुंबईकडे पाहिले जाते. मुंबई, ठाणे जिल्हयाच्या जमिनी विकासाच्या नावावर संपल्या व येथील समुद्रा खाड्या लगतचे व्यवसायही विकासाच्या नावावर संपवले. तिसरी महामुंबई म्हणून रायगड जिल्ह्याकडे पाहिले जात आहे.

रायगड, ठाणे, रत्नागिरी जिल्ह्याच्या किनारपट्टीवर सध्या मोठ-मोठी बांधकामे सुरू असून त्या बांधकामाकरीता रेती ही गुजरातवरून महाराष्ट्रामध्ये आणली जात आहे.

नरेंद्र मोदींनी गुजरातमध्ये असणाऱ्या नद्यांचे पात्र खोल करण्यासाठी परवानग्या देऊन नद्यांचा गाळ म्हणजेच रेतीकडे एक उद्योग म्हणून पाहिले आहे.

महाराष्ट्राच्या सरकारला रेती हा व्यवसाय कधीच दिसत नाही. मुळा-तच कोकण किनारपट्टीवरील नेत्यांच्याही डोक्यात प्रकाश पडत नाही. त्यांनी रेती व्यवसायाकडे उद्योग म्हणून पाहिलेच नाही.

महाराष्ट्राच्या विधीमंडळामध्ये रेती उत्खननाबाबत महाराष्ट्राच्या विधीमंडळामध्ये सरकारला जाबच विच-ारत नाही, ही मोठी शोकांतिका आहे. कोकण किनारपट्टीवर कोकणच्या निसर्गाला घातक असणारे उद्योग बस्तान मांडण्यासाठी सरकार उतावीळ आहे. परंतु, निसर्गाबरोबरच येथील सागरपुत्रांच्या पारंपरिक व्यवसायकडे मात्र, तुच्छतेने पाहिले जात आहे. नद्यांच्या पात्रातील गाळ काढला तरच नद्यांची पात्रे खोल होऊन पाण्याचा साठा वाढणार आहे. घाटावरची परिस्थिती वेगळी आहे.



कोकणातली नैसगिक परिस्थिती वेगळी आहे. कोकणांमध्ये मोठमोठ्या डोंगरांची पावसाळी झीज होते. झीजरूपी गाळ हा नदीच्या पात्रातून समुद्रामध्ये साचतो. पावसाळी मोठ्या प्रमाणामध्ये पाऊस पडल्यानंतर नद्या, खाड्या या गाळाने भरल्यामुळे पावसाचे पाणी ग्रामीण भागाबरोबरच येत शहरामध्ये घुसून मोठी आर्थिक आणि जीवितहानी होते. हे मागच्या वर्षीच महाडच्या पुराने दाखविले.

रेवदंडा चौलचे बंदर हे इ. स.न. १६०० च्या अगोदरपासून हे बंदर आंतरराष्ट्रीय व्यापाराचे बंदर होते. येथून संपूर्ण जगाशी व्यापार केला जायचा. घाटावरून पुणेमार्ग तर रत्नागिरीपासून ते महाडमार्ग अनेक व्यापारी याच चौलच्या बंदरातून आंतरराष्ट्रीय जगाशी व्यापार करायचे याची नोंद रायगडच्या गॅझेटमध्येही आहे.

पूर्वी चौलच्या बंदराची खोली ही अंदाजे २९ फॅदम होती. आता ४ ते ६ फॅदम खोल आहे. आंतरराष्ट्रीय जगाशी व्यापार करणारे म्हणून ओळख असणारे चौल बंदर सध्या गाळाने भरले आहे.

चौलचे बंदर पुन्हा सुरू होऊ शकते यात शंका नाही. येथील कुंडलिका नदी पात्रातील गाळ म्हणजेच रेती तर काढायची आहे. परदेशातून डोंगर फोडून आणलेले लोखंड वितळवून पक्के लोखंडामध्ये रूपांतरण करणारे 'लोह उद्योग' याच समुद्र किनारी बस्तान माडून आहेत. समुद्रावरील रेतीवर याच लोह उद्योगाप्रमाणे प्रक्रिया केली तर 'रेती' हा पारंपरिक व्यवसाय न बनता एक मोठा उद्योग नावरूपात येऊ शकतो.

रेती व्यवसाय करणाऱ्यांना रेती माफीया बोलले तरी चालते? परंतु, स्वतःचा पारंपरिक व्यवसाय टिकवण्यासाठी दुरदृष्टीने पाहत नाहीत. रेतीच्या व्यवसायातून आलेल्या पैशातून गाड्या, सोने, दारू, पार्ट्या, क्रिकेटच्या मॅचेस, कबड्डी यांना देणग्या देऊन धन्यता मानतात.

**ॲड. राकेश पाटील**
**९२७२६२०००५**

परंतु, हा व्यवसाय पिढयान-पिढया टिकावा म्हणून कधीही आंदोलन, मोर्चा, किंवा मा. उच्च न्यायालयामध्ये व्यवसायाची बाजू मांडणारी याचिका दाखल करीत नाहीत, हीच तर मोठी शोकांतिका आहे. ज्यांना समुद्र आणि याच समुद्रकिनारी असणारे छोटे मोठे व्यवसाय माहीत नाहीत ते उच्च न्यायालयात याचिका दाखल करून निसर्गप्रेमाचा आव आणतात आणि ज्यांचे व्यवसायच बंद पडलेत ते राजकीय नेत्यांची गुलामी करतात ही मोठी शोकांतिका आहे.

आगरी, कोळी, कराडी सागरपुत्रांचा रेती व्यवसाय मराठा-ब्राम्हण राजकीय नेत्यांनी संपवल आहे, हे सत्य नाकारता येणार नाही. सागरपुत्रांच्या मतांवर निवडून गेलेल्यांनी रेती व्यवसायिकांची भूमीका विधीमंडळात संसदेत न मांडण्याचे कारण काय ?

कोकण किनारपट्टीवरील लोकांना सुगीचे दिवस येऊ शकतात. येथील समुद्र सफर आणि समुद्रालगतच्या खाड्यामधील जिताडी, कोळंबी, चिंबोरी, बोंबील खाण्यासाठी पर्यटक येतात. याच समुद्र किनारपट्या खोल झाल्या तर येथे नौकानयन वाढून येथील स्थानिकांना रोजगार ही उपलब्ध होवू शकतो.

महाराष्ट्राच्या महसूलामध्ये वाढ करण्याची क्षमता हि समुद्र किनाऱ्यावरील सागरपुत्रांच्या व्यवसायांमध्ये आहे. येथील लोकांची आर्थिक परिस्थिती वाढावी त्यांचे जीवनमान उंचावे यासाठी उद्योगांची गरजच काय? पावसाच्या पुराच्या पाण्याने होणाऱ्या आर्थिक आणि जीवित हानीला जबाबदार आपणच आहोत.

पृथ्वीवर समुद्र हा ७१ टक्के आहे. तर जमीन २९ टक्के आहे. समुद्रातील गाळ म्हणजेच रेती कितीही प्रमाणात काढली तरी समुद्रात फरक पडत नाही. हे साधे नैसर्गिक न्यायाचे तत्व आमच्या नेते मंडळीबरोबरच महसूल अधिकाऱ्यांना समजत नाही हे मोठे दुर्दैव आहे. 'रेती' हा व्यवसाय चोरांचा व्यवसाय नसून या व्यवसायावर अनेकांचे कुटुंबाच्या चुली पेटणाऱ्या आहेत. सगळेच काही इंजिनीअर, डॉक्टर, वकील नाहीत. ज्यांना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण घेता आले नाही ते गवंडी, बांधकाम व्यवसायिक आ-हेत. त्यांच्याही कुटुंबाचे आर्थिक उत्पन्नाचे महत्वाचे साधन ही रेती आहे. देशामध्ये समुद्राच्या खाऱ्यापाण्यापासून मिठाची निर्मिती करणाऱ्या व्यवसायामध्ये मुंबई, ठाणे, रायगडच्या आगरी, कोळ्यांचा मोठा व्यवसाय होता. महात्मा गांधीनी मिठाचा सत्याग्रह केला खरा पण ज्या आगरी, कोळी, कराड्यांचा हा व्यवसाय होता. तो व्यवसाय मुंबईतून विकासाच्या नावावर पार हद्दपार केला. सध्या मिठाचा व्यवसाय हा गुजराथ्ये चालतो हा व्यवसाय करणारे मोठे अब्जाधिश आहेत. आधी विकासाची कारणे देऊन सागरपुत्रांना मिठाच्या व्यवसायातून हद्दपार केले. राजकीय उदासिनतेमुळे रेतीवाला नवरा पाहिजे हे स्वप्नच राहणार आहे. ते सत्यात उतरवायचे झाल्यास गाळात रूतलेली होडी काढण्यासाठी मा. उच्च न्यायालयाबरोबरच जमिनीवरच्या आरपारच्या लढाई व संघर्षाशिवाय पर्याय नाही. **

# –असं, घडतं कधी कधी. !

असं होतं बघा कधी कधी, आपल्या शरीरात असलेले, किंवा काही कारणाने घातलेले धातू जसे लोखंड, सोनं, चांदी वगैरे आपण विसरून गेलेलो असतो. अर्थात अंगावर असणारे सोने चांदी प्रत्यक्ष दिसत असल्याने ते काढून ठेवता येतात. काही सार्वजनिक ठिकाणी आपल्याला सिक्यूरिटीला सामोरे जावे लागते, तिथे सक्त सुचना असतात मोबाईल, काही लोखंडी वस्तू, सोन्या चांदीचे दागिने, वगैरे गोष्टी काढून ठेऊन तेथे असलेल्या सिक्युरिटी चौकटीतून प्रवेश करावा. एकदा असं झालं, अमेरिकेत, तिथे तर फारच कडक सुरक्षा व्यवस्था असते, न्यूयॉर्कमध्ये आम्ही स्टॅचू ऑफ लिबर्टी पहायला आलो होतो.




सगळ्यांची तपासणी निर्वेधपणे पार पडली. माझ्या अंगावर कधी सोनं नसतं किंवा चांदी नसते. मोबाईल काढून ठेवला आणि मी सिक्युरिटीजपाशी आलो. तेथील सुरक्षा चौकटीतून जाताना बझर जोरात वाजला.

शशिकांत मुद्देबिहाळकर
९७६७१५२६०८

माझ्याजवळ तर काहीच आक्षेपार्ह नव्हतं,



तरीही बझर जोरात वाजल्याने मला सिक्युरिटीजनी बाजूला घेतलं. पूर्न्हा माझी तपासणी सुरू केली.

नाना प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. माझी मुलगी, जावई, नातवंडे जमा झाली. माझ्यापाशी काहीच नाही याची खात्री देऊ लागली. मला पून्हा त्या सुरक्षा चौकटीतून जायला सांगण्यात आलं, पुन्हा तो बझर जोरात वाजलाच. मला पुन्हा बाजूला घेतलं आणि आत जाण्यास मज्जाव करण्यात आला. सगळीजण निराश झाली आणि ऊगाचच एक भिती वाटू लागली, कारण सुरक्षा रक्षकांची करडी नजर माझ्यावर होती, काही वेळ गेला, आणि माझ्या चटकन लक्षात आलं की आपलं गुडघ्याचं नी रिपलेसमेंट ऑपरेशन झालं त्यावेळेस माझ्या गुडघ्यात एक लोखंडी पट्टी वजा एक कृत्रिम अवयव टाकण्यात आला आहे, आणि तो सतत मला घेऊनच वावरावे लागणार आहे. त्या शस्त्रक्रियेचं सर्टीफिकेट बॅगेत माझ्याजवळ ठेवण्यास डॉक्टरांनी सांगितलेलं आहे. बझर वाजण्याचं कारण लक्षात आलं. मनावरचं दडपण गेलं. माझी बॅग दूरवर पार्किंग केलेल्या गाडीत होती.

माझ्या नातवाने जाऊन माझी बॅग आणली. ते सर्टीफिकेट जेंव्हा सिक्युरिटीजना दाखवलं तेंव्हा, सॉरी, सॉरी असं म्हणून दिलगीरी व्यक्त करून मला पुन्हा त्या सुरक्षा चौकटीतून प्रवेश करण्यास परवानगी दिली, पून्हा तो बझर जोरात वाजलाच. यंत्राचं काम त्यानं चोख केलं होतं. पण माणसाच्या या गमतीशीर गोष्टींशी त्याला काहीच देणं घेणं नव्हतं. त्या यंत्राला वाकुल्या दाखवत मी आम्हा मंडळींसह स्टॅचू पहाण्यासाठी सज्ज असलेल्या लॉंचमध्ये प्रवेश केला. एक अनुभव २०१९ च्या त्या दिवशी डायरीत लिहिलेला सहज चाळताना आढळला आणि अंगावर शहारे आले. घडतं असं कधी कधी. **


# सत्तानाट्यामध्ये केजरीवाल यांचा ट्विस्ट

जगात आपणच स्वच्छ चारित्र्याचे असल्याचा गवगवा करणाऱ्या अरविंद केजरीवाल यांचा बुरखा तपास यंत्रणांनी टराटरा फाडला आहे. दिल्लीतील मद्य घोटाळा हा शंभर कोटी रुपयांचा नसून सहाशे कोटी रुपयांचा असल्याचे उघडकीस आले आहे. तपास यंत्रणा आणि न्यायालयावरही अविश्वास दाखवण्याची त्यांची वृत्ती घातक आहे. धोरण आणि नैतिकतेच्या गप्पा मारणारे केजरीवाल यांचे पाय कसे मातीचे आहेत, हे मद्य घोटाळ्यातील आरोपावरून पुढे आले आहे. सध्याच्या विरोधी पक्षातील दोन माजी मुख्यमंत्र्यांची उदाहरणे त्यांच्यासमोर असताना त्यांनी त्याकडे डोळेझाक केल्याने त्यांच्यावर ही वेळ आली आहे. लालूप्रसाद यादव यांना पशुसंवर्धन घोटाळ्यात 'सीबीआय'ने अटक केली, तेव्हा त्यांनी राजीनामा देऊन पत्नी राबडीदेवी यांना मुख्यमंत्री केले. झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे उदाहरण तर ताजे आहे. जमीन घोटाळ्यात ईडीकडून आपल्याला अटक होईल, अशी भीती वाटत असतानाच त्यांनी राजीनामा दिला होता. केजरीवाल मंत्रिमंडळातील सत्येंद्र जैन आणि मनीष सिसोदिया हे दोन सदस्यही तुरुंगात आहेत. जैन यांना ३१ मे २०२२ रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतर सिसोदिया यांना अटक करण्यात आली. तुरुंगात गेल्यानंतर श्री. जैन नऊ महिने मंत्री म्हणून पगार घेत होतेच, पण या काळात त्यांनी भत्तेही घेतल्याचे माहिती अधिकार कायद्याखाली मागवलेल्या माहितीतून उघड झाले. तुरुंगात असतानाही ते नऊ महिने मंत्री राहिले, असा याचा अर्थ होतो. यातून केजरीवाल यांचे धोरण, हेतू आणि नैतिकता दिसून येते. तुरुंगातूनच सरकार चालवणार असल्याचे केजरीवाल यांनी म्हटले आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार ते सध्या 'ईडी'च्या कोठडीत आहेत. तुरुंगातून ते सरकार कसे चालवणार याचे पहिले उदाहरण समोर आले. त्यांनी दिल्लीतील पाणीपुरवठ्याबाबत आदेश जारी केला आहे. त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकारी आतिशी यांनी 'मीडिया'समोर त्यांचा आदेश वाचून दाखवला. जिथे पाण्याची कमतरता आहे तिथे योग्य संख्येने टँकरची व्यवस्था करा, मुख्य सचिव आणि इतर अधिकाऱ्यांना योग्य ते आदेश द्या; जेणेकरून जनतेला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, असे या आदेशात म्हटले आहे. लोकांची आपल्याला किती काळजी आहे, हे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. एक काळ असा होता, की लालकृष्ण अडवाणी, माधवराव शिंदे, कमलनाथ यांच्यासारख्या नेत्यांची नावे हवाला व्यापाऱ्याच्या कथित जैन डायरीत आली होती. त्यांच्यावर लाच घेतल्याचा आरोप झाला होता, तेव्हा त्यांनी नैतिकतेच्या आधारावर तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. लालबहादूर शास्त्री यांनी रेल्वे अपघातानंतर राजीनामा दिला होता. काही महिन्यांपूर्वी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी अटकेपूर्वी राजीनामा देऊन नैतिक आचरणाचे दर्शन घडवले होते. भारताला अशी समृद्ध परंपरा आहे. दिल्लीतील दारू घोटाळ्याचे सत्य काय आहे हे न्यायालयाला ठरवायचे आहे; पण या घोटाळ्यात एका मुख्यमंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले आहेत. त्यांना अटक करण्यात आली आहे. मात्र तरीही ते मुख्यमंत्रिपदाला चिकटून आहेत.

राजकारणाचे गटार स्वच्छ करण्याच्या नादात त्या गटाराचे भाग होत असल्यास आपल्याला इतरांकडे बोट दाखवण्याचा अधिकार राहत नाही, हे केजरीवाल यांच्या उदाहरणातून स्पष्ट झाले आहे. केवळ पैसे खाणे हा भ्रष्टाचार नाही, तर आचार विशुद्ध नसणे, कायदे पाळण्यास नकार देणे हा ही भ्रष्टाचारच आहे, हे त्यांना समजायला हवे. तपासी यंत्रणा भाजपच्या हाती आहेत, असा आरोप करून चालत नाही, तर तो सिद्ध करावा लागतो. तपास यंत्रणांना जुमानायचेच नाही, त्यांच्या दहा-दहा समन्सकडे दुर्लक्ष करायचे, हे कायद्याच्या राज्याला आव्हान होते. यंत्रणांच्या विरोधात न्यायालयात दाद मागण्याचा पर्याय होता; परंतु दहा समन्स येईपर्यंत आणि अटक होण्याची भीती वारंवार व्यक्त करण्याऐवजी सुरुवातीलाच चौकशीला सामोरे गेले असते, तर ऐन लोकसभेच्या निवडणुकीच्या काळात पक्षाला नेतृत्वाविना लढावे लागले नसते. अटक झाल्यानंतरही पदाचा राजीनामा न देण्याचा केजरीवाल यांचा हट्ट प्रशासनावर परिणाम करणार आहे. पंतप्रधान मोदी यांच्यावर एकाधिकारशाहीचा आरोप करता करता आपणही त्याच मार्गाने चाललो आहोत, हे त्यांच्या लक्षात येत नाही. दिल्ली मद्य घोटाळ्यात तथ्य नसेल, तर यापूर्वी अटक केलेल्या उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह अन्य व्यक्तींना अजूनही जामीन का मिळाला नाही, हा प्रश्न उरतोच. तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या आमदार के. कविता यांना दिल्ली मद्य घोटाळ्यातील सहभाग आणि 'आप'ला शेकडो कोटी रुपये दिल्याप्रकरणी अटक झाल्यानंतरच केजरीवाल यांना कोणत्याही क्षणी अटक होईल, हा कयास प्रत्यक्षात आला आहे.

राही भिडे



तीन वर्षांपूर्वी, १७ नोव्हेंबर २०२१ रोजी दिल्लीतील आम आदमी पक्षाच्या सरकारने नवीन दारू धोरण लागू केले होते. या नवीन धोरणानुसार दिल्लीची एकूण ३२ झोनमध्ये विभागणी करण्यात आली असून प्रत्येक झोनमध्ये तुम्ही दारूची २७ दुकाने उघडू शकता, असे सांगण्यात आले. या आकडेवारीनुसार एकूण ८४९ दुकाने उघडली जाणार होती. पूर्वी दारू व्यवसायात सरकारचा सहभाग होता. तो नवीन धोरणानुसार रद्द करण्यात आला. नवीन धोरण लागू होण्यापूर्वी दिल्लीतील दारूची ६० टक्के दुकाने सरकारी मालकीची होती, तर ४० टक्के खासगी कंपन्यांच्या मालकीची होती; मात्र नवीन धोरणानंतर दुकानांचे शंभर टक्के खासगीकरण होणार असल्याची चर्चा होती. या धोरणानंतर ३५०० कोटी रुपयांचा थेट फायदा होईल, असा केजरीवाल सरकारचा अंदाज होता. नवीन धोरणानंतर दारू दुकानाच्या परवान्याचे शुल्क अनेक पटींनी वाढले. तांत्रिक भाषेत याला एल १ लायसन्स म्हणतात. त्यासाठी दुकानदार आधी २५ लाख रुपये देत असत. आता त्याला पाच कोटी रुपये द्यावे लागतात. नवीन धोरण लागू झाल्यानंतर महसुलात मोठी घट झाल्याचा आरोप होऊ लागला. ७५० मिलीलीटर दारूची किंमत ५३० रुपयांवरून ५६० रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे किरकोळ व्यापाऱ्याचा नफा ३३.३५ रुपयांवरून ३६३.२७ रुपयांपर्यंत वाढला. याचा सरळ अर्थ किरकोळ व्यावसायिकाला दहापट नफा मिळत होता; पण सरकारला पूर्वी मिळणारा ३२९.८९ रुपयांचा फायदा ३.७८ रुपयांवर आला आहे. त्यामुळे सरकारचे मोठे नुकसान झाले. असे हे प्रकरण आहे. या प्रकरणी के. कविता यांना अटक करण्यात आली. बुचीबाबू या अकौंटंटचीही 'ईडी'ने अनेक तास चौकशी केली. त्यांनीच या प्रकरणात सर्वात आधी केजरीवाल यांचे नाव घेतले. कविता, सिसोदिया आणि केजरीवाल यांच्यात राजकीय साटेलोटे सुरू असल्याचा दावा त्यांनी केला होता. 'ईडी'च्या तपासात असेही दिसले की सिसोदिया आणि केजरीवाल हे उत्पादन शुल्क धोरणावर एकत्र काम करत होते. सिसोदिया यांच्यावर काही आरोप झाले तर केजरीवाल यांची चौकशी होणे अपरिहार्य होते. भ्रष्टाचाराचा मुद्दा असो वा दारू व्यवसाय; दोन्ही मुद्यांवर भाजप 'आप'ची कोंडी करत आहे. अर्थात मोदी यांच्याप्रमाणेच केजरीवाल यांना आव्हानांचे रूपांतर संधीमध्ये कसे करायचे हे माहीत आहे. दिल्लीतील एक मोठा वर्ग केजरीवाल यांच्याकडे नायक म्हणून पाहतो. नायकाला अटक करणारे खलनायक असल्याच्या भावनेने हा वर्ग त्वेषाने पेटून उठला, तर भाजपला राजकीय नुकसान सोसण्याची तयारी ठेवावी लागेल. 'आप'ची ओळख आंदोलनामधूनच निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत या खेळपट्टीवर ती सर्वात मजबूत मानली जाते. केजरीवाल हे 'आप'चे मेंदू आणि आधारस्तंभ आहेत, त्यांच्याशिवाय 'आप' निवडणूक प्रचारात कोणताही प्रभाव पाडू शकणार नाही, असे भाजपला वाटते. २५ मे रोजी दिल्लीत निवडणुका होणार आहेत. तोपर्यंत केजरीवाल तुरुंगात राहिले, तर 'आप' कमकुवत होईल आणि निवडणूक लढवण्याच्या क्षमतेवर परिणाम होईल, असे मानणारा एक वर्ग आहे. **

# 'फूल'बागेतला एक उनाड दिवस

> जगण्यातील ताणतणाव ही काही आजची गोष्ट नाही. तणावामागील कारणे वेगळी असली तरी त्याने कधीच माणसाची साथ सोडलेली नाही, हेही खरेच. त्याच्या प्रभावाखाली जगणारा समाज कधी कधी निखळ हसणेच विसरतो. म्हणूनच 'एप्रिलफूल'सारखे प्रयोजन बघायला मिळते. दुसऱ्याला मुर्ख बनवण्यात वेगळीच मजा असते आणि कोणतेही नुकसान न झाल्यास मुर्ख होणेही स्वभावाला मानवते.


'अगं... अगं... तुझ्या अंगावर झुरळ आहे बघ..., ड्रेस फाटलाय मागून..., शाई सांडतीये दफ्तरात..., मावशीने तुला लवकर बोलायले आहे घरी, पाहुणे आले आहेत... ओळखीचे वाटताहेत ना हे संवाद? आज पन्नाशीच्या उंबरठ्यावर असणाऱ्या पिढीने लहानपणी झेललेले आणि फेकलेले अतिशय परिचित असे संवाद आहेत ते! फसवण्याचा, एकमेकांना फूल (उल्लू) बनवण्याचा परवाना देणाऱ्या एक एप्रिलला प्रतिभेची आणि विचारांची मर्यादित कुमक असण्याच्या त्या काळात अशाच संवादांनी एप्रिलफूल झाल्याचा वा केल्याचा निर्भेळ आनंद साजरा केला जायचा. आता त्या बालिशपणाचे हसू येते... पण दुसऱ्याला वेडे बनवण्यातला आनंद आजही कमी झालेला नाही हे ही मान्य करावे लागते. त्यामुळेच जागतिक पातळीवर साजऱ्या होणाऱ्या आणि हसत हसत मूर्ख बनवणाऱ्यांच्या टोळीमध्ये सामील होण्याची धडपड आजही केली जाते. तसे पाहायला गेले तर वर्षभर या ना त्या कारणाने आपण 'फूल' ठरतच असतो. कारण पूर्वीच्या तुलनेत असे उपद्व्याप करणाऱ्यांची संख्याही आता वाढली आहे. सहाजिकच अशा 'फुलां'ची बाग आता अधिकच बहरली. प्रलोभने वाढली, रात्रीच नव्हे तर दिवसाही स्वप्ने पडू लागली आणि या दिवास्वप्नांचा पाठलाग करण्याच्या नादानेही अनेकांना मुर्खांच्या कळपात सामावून घेतले. पूर्वी वर्षातून एकदा 'फूल' होण्यात गंमत वाटायची. मात्र ही गंमत पाकिटावर डल्ला मारु लागल्यामुळे आता त्याची काळजी वाटते.

स्वाती पेशवे

बरे... आपल्याला फूल बनवणाऱ्यांचे अलिकडचे फंडे तरी किती वेगवेगळे...! कधी शिक्षण फूल बनवते, कधी गुंतवणुकीचे चुकीचे सल्ले फूल बनवतात, कधी भरभक्कम रक्कम मोजून मागवलेली उत्पादने आपल्याला मुर्ख बनवून जातात, कधी एखादा तथाकथित मित्र वा मैत्रीण आपल्याला सहज मुर्खात काढून जाते... अगदी एखादा वैद्यकीय तज्ज्ञ मृत्यूशय्येवरील माणसाला लवकरच 'बरे व्हाल हो...' असे सांगत खोटा दिलासा देतो तेव्हा एक प्रकारे त्याला फूलच बनवतो. समोर धोका दिसत असूनही त्याकडे डोळेझाक करण्यास भाग पाडून एका भासमान जगात जगण्यास उद्युक्त करणारी आजची प्रत्येक गोष्ट आपल्याला उल्लू बनवते आणि बुद्धी गहाण ठेवून आपण ती सहर्ष स्विकारतो. म्हणूनच सध्या केवळ एक एप्रिललाच नव्हे तर वर्षातील कुठल्याही दिवशी आपण हा दिवस साजरा करतो, असे म्हणण्यास पूर्ण वाव आहे. हा 'फूलबाग' अधिकाधिक बहरत आहे.

तसे पहायला गेले तरी उल्लू बनण्यामागील काही कारणे 'सात्विक'ही असतात. अडचणीत असताना पैसे मागण्यास संकोच करतोय हे ओळखून एखादा मित्र नकळत त्याच्या खिशात नोट सरकवतो आणि अरे, आपण ही रक्कम विसरुनच गेलो की, असे म्हणतो. अशा वेळी ती हाती लागलेला माणूस सुखावतो तेव्हा एक प्रकारे मुर्खच बनलेला असतो. कधी कधी एखाद्या ग्रुपमध्ये कंपूशाही अचानक डोके वर काढते आणि आपल्याला वगळून बाकीच्या मैत्रिणींनी सिनेमा बघितल्याचे इंस्टाग्रामच्या स्टोरीवरुन कळते तेव्हाही एप्रिलफूल झाल्यानंतर येते तशीच विषण्णता येते. फार कशाला, जोडीदाराने न सांगता झोडलेली एखादी पार्टीही आपल्या विश्वासाला तडा गेल्याचे दु:ख देते आणि मुर्ख बनल्याची जाणीव प्रबळ होते. थोडक्यात काय, तर कॅप्सुलमध्ये भरुन कडूजहर औषध देण्यापासून भल्यामोठ्या पॅकिंगमध्ये पेपरच्या गुंड्याळ्या भरुन बारीकशी भेटवस्तू देण्यापर्यंत कोणी कोणाला उल्लू बनवत असतो आणि कोणी तरी फूल होत असतो. त्यामुळेच वर्षातील एका दिवशी कोणतेही नुकसान न करता कोणी तुम्हाला मुर्ख बनवले तर राग मानू नका.

हा दिवस साजरा करण्यामागील ऐतिहासिक कारणांची यादी बरीच मोठी आहे. त्यापैकी एक म्हणजे पूर्वीच्या काळी रोमन लोक एक एप्रिल हा नववर्षाचा पहिला दिवस म्हणून साजरा करत असत. पण, पोप ग्रेगरी (आठवा) याने ग्रेगेरियन कालगणनेचा प्रारंभ केला (ग्रेगेरियन म्हणजे आपण आता वापरत असलेली कालगणना). त्यानुसार नवीन वर्ष एक जानेवारीला साजरे केले जाऊ लागले. पण काही लोकांचा या बदलाला विरोध होता तर अनेक लोकांना या बदलाची काहीच माहिती नव्हती. त्यामुळे या लोकांनी एक एप्रिललाच नवीन वर्ष साजरे केले. अर्थातच अशांची जागोजागी खिल्ली उडवली गेली. यातूनच 'एप्रिल फूल' या संकल्पनेचा जन्म झाला. ऐतिहासिक संदर्भ असणाऱ्या या दिवसाचे प्रस्थ सोशल मीडियाच्या जमान्यात कमालीचे वाढले आहे. इतकेच कशाला, गुगलवर नुसते 'एप्रिल फूल' असे टाईप केले तरी इतरांना मूर्ख बनवण्याच्या असंख्य टिप्स सहज मिळून जातात. आजकाल 'प्रँक'च्या नावाखाली इतरांना मूर्ख बनवणारे व्हिडिओ युट्युबवर धुमाकूळ घालताना दिसतात तर अनेक टेलिव्हिजन किंवा रेडियो चॅनेल्सही विशिष्ट कार्यक्रमांद्वारे लोकांना रीतसर मूर्ख बनवण्याची योजना आखतात.




वेगवेगळ्या प्रकारांनी वेड्यात काढायचे आणि दोघांनीही याचा आनंद लुटण्याचे, बकरा बनवण्याचे अनेक मार्ग सध्याच्या मनोरंजनजगताने शोधून काढले आहेत. पण अशा खेळांमध्ये किती रमायचे आणि त्यातून कधी बाहेर पडायचे, हेदेखील समजायला हवे. अन्यथा, खेळ जीवही घेऊ शकतात हे अलिकडच्या अनेक ऑनलाईन गेम्सने दाखवून दिले आहे. अशा प्रकारे मुर्ख होणे व्यक्तीसाठीच नव्हे तर समाजासाठीही घातक आहे. मुळात उत्सव आणि विशिष्ट प्रथांचे प्रयोजन मनाला उभारी देणे, एकसुरीपणा कमी करणे, आनंद आणि उन्मेष निर्माण करणे हे असते. त्यानुसार एप्रिल फूलनिमित्त गंमत करण्यातही कमालीची विविधता दिसून येते. कॅनडा, न्यूझिलंड, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, सायप्रस आणि दक्षिण आफ्रिका अशा काही देशांमध्ये विनोद दुपारपर्यंतच केले जातात. एप्रिलफूलचा दिवस संपला असूनही तो साजरा करतोयस म्हणजे तू मूर्ख आहेस, असा टोमणा एखाद्या व्यक्तीला मारला जातो. फ्रान्स, इटली, दक्षिण कोरिया, जपान, रशिया, हॉलंड, जर्मनी, ब्राझील, आयर्लंड आणि अमेरिकेसारख्या देशात मात्र 'एप्रिलफूल'ची गंमत दिवसभर साजरी केली जाते. फ्रान्स आणि इटलीमध्ये लहान मुले एकमेकांच्या पाठीवर कागदाचा मासा चिकटवतात आणि 'एप्रिल फिश' म्हणून टेर उडवतात.

इराणी लोक पर्शियन नववर्षाच्या तेराव्या दिवशी एकमेकांना मूर्ख बनवतात. हा दिवस एक किंवा दोन एप्रिल रोजी येतो. या प्रथेला 'सिजदा बेदर' असे म्हणतात. जगात अस्तित्वात असणारी सर्वात प्राचीन विनोद प्रथा म्हणून त्याकडे पाहिले जाते. स्पॅनिश भाषा बोलणाऱ्या देशांमध्ये दुसऱ्याला मूर्ख बनवण्याची प्रथा २८ डिसेंबर रोजी साजरी केली जाते. कोरियात हिवाळा सुरू होतानाच्या पहिल्या दिवशी असाच एक सण साजरा केला जातो. त्या दिवशी एका भांड्यात बर्फ भरून परिचितांकडे कोणत्या ना कोणत्या निमित्ताने पाठवला जातो. मग हा बर्फ स्विकारणाऱ्याला तो पाठवणाऱ्याची इच्छा पूर्ण करावी लागते. अर्थात हा सगळा खेळीमेळीचा मामला असतो. पोलंडमध्ये एक एप्रिल हा संपूर्ण दिवस हास्यविनोदाने भरलेला असतो. सर्वसामान्य लोक, अगदी प्रसारमाध्यमेही या दिवशी खोट्या, विनोदी बातम्या पसरवतात. या दिवशी शक्यतो गंभीर बाबी टाळल्या जातात. याचा प्रभाव एवढा होता की १ एप्रिल १६८३ रोजी पोलंडचा राजा लिओपोल्ड (पहिला) याच्याबरोबर झालेल्या तुर्कविरोधी कराराची तारीख आदल्या दिवशीची म्हणजे ३१ मार्च ठरवण्यात आली. स्कॉटलंडमध्ये एप्रिलफूलचा दिवस 'हंट द गॉक डे' म्हणून साजरा होतो. गॉक म्हणजे मूर्ख व्यक्ती. या दिवशी संदेश पाठवून लोकांना मूर्ख बनवले जाते. थोडक्यात काय तर, ताण कमी करण्याचा एक रिवाज म्हणजे एप्रिलफूल... आजकालच्या धकाधकीच्या आयुष्यात एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या नादात आपण निखळ हसणेच विसरलो आहोत. रात्रंदिवस काम आणि त्यामुळे वाढणारा ताण यातून काही क्षण निवांत जगायचे असतात, हे अनेकांच्या गावीही नसते. त्यामुळे तणावातून बाहेर पडण्यासाठी मानवी मनाला अशा प्रथांची भुरळ पडते आणि आनंद साजरा करण्याची ही संधी साधण्यात कोणी मागे राहात नाही. शेवटी, हसणे हाच जगण्याचा केंद्रबिंदू असायला हवा. त्यामुळेच असेल कदाचित, हल्ली हास्य क्लब्जची चलती आहे. एप्रिलफूलही आरोग्यावर, विशेषत: हृदयावर चांगला परिणाम करतो, असे संशोधन सांगते. अमेरिकेतील 'सोसायटी फॉर व्हॅस्क्युलर सर्जरी'च्या विवियन हापर्नकडून हे संशोधन करण्यात केले होते. हसण्यामुळे रक्तप्रवाहात वाढ होते आणि रक्तवाहिन्यांचे काम सुधारते असा निष्कर्ष यावेळी निघाला. या दिवशी होणाऱ्या हास्यविनोदामुळे मनावरचा ताण हलका होतो. हसण्यामुळे तणावाच्या हार्मोन्स (कॉर्टीसोल, एपिनेफ्राईन, डोपामाईन आणि ग्रोथ हार्मोन)चा स्तर खालावतो आणि आरोग्यदायी हार्मोन्स (म्हणजे एन्डॉर्फीन्स आणि न्युरोट्रान्समीटर्स)चा स्तर वाढतो. परिणामी, ताणतणाव दूर राहून आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. तेव्हा हे सगळे लाभ लक्षात घ्या आणि मुर्ख बनवण्यासाठी सज्ज राहा... **

## वाचनीय, प्रेरक आणि संग्राह्य

# सरखेल कान्होजी आंग्रे

'सरखेल कान्होजी आंग्रे' हे डॉ. भास्कर धाटावकर लिखित पुस्तक मुंबईच्या चेतन प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. सुरुवातीला लेखकाचे सविस्तर मनोगत वाचावयास मिळते. या पुस्तकाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. दीपक गायकवाड यांची प्रस्तावना लाभली आहे. डॉ. भास्कर धाटावकर पुराभिलेख विभागातून संचालक पदावरून जून,२०११ मध्ये निवृत्त झाल्यानंतर सातत्याने इतिहासावर लेखन करीत आहेत. या मालिकेतीलच हे पुस्तक आहे. त्यांच्यामते, हे पुस्तक अतिशय चिकित्सकपणाने लिहिले असल्याने वाचनीय झाले आहे. या पुस्तकात एकूण सतरा प्रकरणे आहेत. पुस्तकाचे रंगीत, समर्पक मुखपृष्ठ बाबासाहेब चंदनशिवे आणि विनोदकुमार टेकवडे यांनी साकारले आहे.




कान्होजी आंग्रे यांचे मूळ आडनाव सकपाळ होते. त्यांचे वडील तुकोजी हे दर्यावर्दी होते आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारात नोकरीला होते. आपला मुलगा साक्षर होण्यासाठी हर्णे मुरुड गावच्या जोशींकडे त्याला ठेवले होते.कान्होजी तेथे गुरे राखणीचे काम करतानाच, संस्कृत, धर्मशास्त्र यांचा कान्होजींनी अभ्यास केला होता.

प्रा.शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

लहानपणी देवी आल्याने त्यांच्या चेहऱ्यावर देवीचे व्रण राहिले होते. त्यांचा चेहरा उग्र आणि करारी दिसत असे. नजर धारदार आणि भेदक होती. उत्तम तलवारी जमा करण्याचा त्यांना छंद होता. आंग्रे कुटुंबीय मूळचे पुण्याजवळील आंग्रेवाडीचे म्हणून ते आंग्रे म्हणून ओळखले जात. वयाच्या सोळाव्या वर्षी कान्होजी छत्रपती संभाजी महाराजांच्या दर्यावर्दी पथकात सामील झाले. ही नेमणूक सुवर्णदुर्ग किल्ल्यातील आरमारी पथकात झाली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी दूरदृष्टीने सागरी सत्ता स्थानिक लोकांच्या साहाय्याने भक्कम करण्याचा प्रयत्न यापूर्वीच सुरू केला होता. कारण इंग्रज, पोर्तुगीज, डच या दर्यावर्दीनी भारतीय किनारे आणि भूभाग नियंत्रणात आणण्यास सुरुवात केली होती. सुरुवातीलाच कान्होजींना सिद्दी विरुद्धच्या सागरी लढाईत भाग घ्यावा लागला होता. अल्पावधीतच कान्होजींनी सागरी युद्धाचे बारकावे, डावपेच आत्मसात केले होते.

छत्रपती संभाजी महाराजांनंतर राजाराम महाराजांच्या काळात आरमाराची सूत्रे, सरखेल सिधोजी गुजरकडे सोपविली गेली. सरखेल म्हणजे आरमाराचा सर्वाधिकारी. कान्होजींकडे सुवर्णदुर्ग आणि घेरियाची जबाबदारी स्वतंत्रपणे सोपविली गेली. कान्होजींकडे त्यावेळी आठ ते दहा जहाजे होती. शिवाजी महाराजांनी १६७९ मध्ये खांदेरी आणि नंतर उंदेरी ही बेटे जिंकून टोपीकर आणि सिद्दीवर जरब बसविली होती. शिवरायांनी कुलाबा किल्ल्याची निर्मिती केली. पुढे कान्होजींना कुलाबकर आंग्रे हे बिरुद जोडले गेले. बाळाजी विश्वनाथ हे कान्होजींचे बालमित्र होते. त्यांनी कान्होजीस शाहूंच्या पक्षात आणले. परिणामी मराठ्यांच्या आरमाराची शक्ती अनेक पटींनी वाढली. राजाराम महाराजांनी कानोजींची सरखेलपदावर नेमणूक केली होती. ऑगस्ट,१७२१ मध्ये इंग्रज आणि पोर्तुगीज यांनी संयुक्तपणे, प्रचंड फौजांसह कुलाबा किल्ल्यावर हल्ला चढविला. कान्होजींनी सर्व पूर्वतयारी केली होती. परिणामी दोन्ही फौजांचा मोठा पराभव झाला. पेशवे पहिले बाजीराव यांनीही कान्होजींना सहाय्य केले होते. या युद्धातील विजयामुळे कान्हजींची शक्ती आणि सत्ता सर्वमान्य झाली होती. कान्होजींच्या आरमाराची रचना आणि त्यामधील विविध नोकरदार याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. नंतरच्या प्रकरणात आंग्रे यांच्या ताब्यातील किल्ल्यांची सविस्तर माहिती वाचावयास मिळते. कान्होजींच्या काळात कोकणस्थ ब्राह्मण आणि क्रमवंत यांच्यातील विकोपाला गेलेला वाद, त्यांनी धर्मशास्त्राच्या आधारे सोडविला होता. 'परक्यांच्या नजरेतून कान्होजी' या प्रकरणात कान्होजींविषयी इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज डच यांना काय वाटत होते, ते कागदपत्रांच्या आधारे स्पष्ट केले आहे. आंग्रेकालीन टाकसाळ, टपाल व्यवस्था याविषयीची माहितीही वाचकाला प्राप्त होते.

ब्रम्हेंद्रस्वामी आणि कान्होजी आंग्रे यांचे संबंध तसेच आंग्रेकालीन स्त्रिया यांचे गुरुशिष्यत्वाचे भावनिक नाते, याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. कान्होजींना तीन राण्यांपासून सहा पुत्र झाले. त्यांच्यात पुढे सत्तासंघर्षातून यादवी पेटली. ४ जुलै १७२९ रोजी सरखेल कान्होजी आंग्रे यांचे निधन झाले. आंग्रेकालीन अष्टागरे, मंदिरे आंग्रेकालीन स्त्रीरत्ने यांची माहिती वाचनीय आहे. रायगड जिल्ह्यातील ख्यातनाम इतिहासकारांचा परिचय परिशिष्टमध्ये वाचावयास मिळतो. रंगीत छायाचित्रांमुळे पुस्तकाचे महत्त्व वाढले आहे.लेखकाचा सचित्र, सविस्तर परिचय दिला आहे.या पुस्तकातील विपुल मुद्रणदोष वाचकाला खटकतात. प्रकरणांच्या रचनेत आणि मांडणीत काहीसा विसकळीतपणा जाणवतो. **

पुस्तकाचे नाव : सरखेल कान्होजी आंग्रे
लेखक : डॉ. भास्कर धाटावकर.
प्रकाशक : चेतन प्रकाशन, खार (प) मुंबई- ५२. मो. ७७२००९३३२१
प्रथम आवृत्ती :२८ जून २०२३.
पृष्ठे : १२२, मूल्य : रु.२५०/-

**निवडक**

## क्रिकेटप्रेमी महिलेची फसवणूक

**बेंगळुरू :** आयपीएलच्या बनावट तिकिटांशी संबंधित एक नवीन प्रकरण समोर आले आहे. बेंगळुरूमधील एक महिला आयपीएल सामन्यासाठी ऑनलाइन तिकीट खरेदी करण्याचा प्रयत्न करत होती. ऑनलाइन तिकीट शोधत असतानाच तिची नजर एका फेसबुक अकाउंटवर पडली, ज्यावर आयपीएल क्रिकेट तिकीट असे लिहिले होते. महिलेने क्रॉस चेक न करताच त्या अकाउंटमध्ये दिलेल्या एका मोबाइल नंबरवर फोन केला आणि त्यानंतर तिने जवळपास ८६,००० रुपये गमावले.

## खो-खो असोसिएशनची सभा

**मुंबई :** महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची निवडणुक ७ एप्रिल रोजी होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर विशेष सर्वसाधारण सभा ठीक बारा वाजता पुण्यातील श्री शिवछत्रपती क्रीडा नगरी सभागृह बालेवाडी येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेत चौवार्षिक (२०२४ ते २०२८) निवडणुकीचे निकाल जाहीर केले जाणार आहेत. या सभेला सर्वांनी वेळेवर उपस्तीत राहण्याचे आवाहन चंद्रजीत जाधव व गोविंद शर्मा यांनी केले आहे.

## राफेल नदालची माघार

**मोनॅको :** स्पेनचा महान टेनिसपटू राफेल नदालने सर्वाधिक १४ वेळा फ्रेंच ओपन ग्रँडस्लॅमचे अजिंक्यपद पटकावले असून यंदा या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी तो प्रयत्नशील आहे. परंतु, दुखापतीमुळे मॉंटे कार्लो मास्टर्स टेनिस स्पर्धेतून माघार घेत टेनिस स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता नदालचा लाल मातीच्या कोर्टवरील सराव लांबणीवर पडला आहे. ३७ वर्षीय नदालला मागील वर्षी दुखापत झाली. या वर्षी तो फक्त तीन व्यावसायिक लढती खेळला आहे.

## महिला क्रिकेटपटूंचा अपघात

**कराची :** पाकिस्तान महिला क्रिकेट संघातून वाईट एक बातमी समोर आली आहे. संघाच्या महिला क्रिकेटपटू बिस्मा मारूफ आणि गुलाम फातिमा यांचा शुक्रवारी संध्याकाळी कराचीमध्ये कार अपघात झाला. अपघातात त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. या महिला खेळाडूंवर तातडीने प्राथमिक उपचार करण्यात आले असून त्या सध्या पीसीबीच्या वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली आहेत. या दोन्ही क्रिकेटपटू कधीपर्यंत पूर्णपणे तंदुरुस्त होतील हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## अभिषेकवर युवराजची नाराजी

**नवी दिल्ली :** आयपीएलमध्ये आतापर्यंत हैदराबाद संघाने फलंदाजीच्या आघाडीवर उत्कृष्ट कामगिरी केली. संघाकडून डावाची सुरुवात करणारा फलंदाज अभिषेक शर्मा चांगल्या फॉर्ममध्ये फलंदाजी करत आहे. चेन्नईविरुद्धच्या सामन्यातही हैदराबाद संघासमोर १६६ धावांचे लक्ष्य असताना अभिषेकने सुरुवातीलाच ३०० पेक्षा जास्तच्या स्ट्राइक रेटने केवळ १२ चेंडूत ३७ धावांची खेळी करत सामना एकतर्फी केला. मात्र, अभिषेकच्या या शानदार खेळीनंतरही युवराज सिंगने त्याला आऊट होण्याच्या पद्धतीवर नाराजी व्यक्त केली.

# कॅन्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा

## भारताच्या पाचही बुद्धिबळपटूंची बरोबरीने सुरुवात; प्रज्ञानंदचे खास यश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**भारताच्या पाचही बुद्धिबळपटूंनी ‘कॅन्डिडेट्स’ म्हणजेच आव्हानवीरांच्या स्पर्धेतील आपल्या मोहिमेस बरोबरीने सुरुवात केली. त्यातही आर. प्रज्ञानंदचे यश खास ठरले. त्याने जागतिक क्रमवारीतसहाव्याक्रमांकावरअसलेल्या फ्रान्सच्या अलिरेझा फिरूझाला बरोबरीत रोखले. खुल्या विभागात डी. गुकेश आणि विदित गुजराथी, तसेच महिलांमध्ये कोनेरू हम्पी आणि आर. वैशाली या भारतीयांमध्ये झालेले पहिल्या फेरीतील सामनेही बरोबरीत सुटले.**



संभाव्य विजेत्यांच्या शर्यतीत सर्वाधिक पसंती मिळत असलेले फॅबियानो कारुआना आणि हिकारू नाकामुरा हे अमेरिकेचे ग्रँडमास्टर पहिल्याच फेरीत समोरासमोर आले. दोघांनीही धोका न पत्करता ही लढत बरोबरीत सोडवणे पसंत केले. अझरबैजानच्या निजात अबासोवला नमवण्यात रशियाच्या इयान नेपोम्नियाशीला अपयश आले.

प्रज्ञानंदने काळ्या मोहऱ्यांसह खेळताना रुय लोपेझ पद्धतीने सुरुवात करण्यास पसंती दिली. फिरूझानेही आपल्या लौकिकाला साजेशी सुरुवात केली. प्रज्ञानंदने राजाच्या बाजूने आक्रमण करण्याची संधी शोधली. त्यानंतर फिरूझाने प्रतिआक्रमण करताना २९व्या चालीला मोहरे आणि पाठोपाठ घोड्याचे बलिदान देत डाव वेगळ्याच वळणावर नेऊन ठेवला. अशा वेळी निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीचा सामना करताना प्रज्ञानंदने बचाव भक्कम करण्यावर भर दिला आणि चालींच्या पुनरावृत्ती होत असताना ३९व्या चालीला दोघांनी सामना बरोबरीत सोडण्याचा निर्णय घेतला.

गुकेश आणि विदित या भारतीयांमधील डावही असाच चालींच्या पुनरावृत्तींमुळे बरोबरीत सुटला. सर्वोच्च स्तरावर फारसा वापर न होणाऱ्या ताराश बचाव पद्धतीने विदितने खेळ केला. त्यामुळे गुकेशने फारसा धोका पत्करणे टाळले. त्यामुळे पटावर स्थिर स्थिती निर्माण झाली होती. विदित अशामध्येही संतुलित स्थितीत संधी शोधत राहिला आणि सतराव्या चालीला त्याने उंटाचे बलिदान देण्याची कल्पक चाल रचली. मात्र, गुकेशनेही तशाच चालीची पुनरावृत्ती केली. पुढे चालींची पुनरावृत्ती होत राहिल्याने दोघांनी डाव बरोबरीत सोडण्यास पसंती दिली.

स्पर्धेदरम्यान विदितबरोबर सूर्यशेखर गांगुली आणि डॅनियल कोवाचुरो साहाय्यक म्हणून काम करत आहेत. गुकेशला पोलंडच्या ग्रेगॉर्ज गजेवस्कीची साथ मिळत आहे. महिला विभागात वैशालीने आपली अनुभवी सहकारी हम्पीला रोखण्यात यश मिळवले. वैशालीने इटालियन सुरुवात करताना उत्तरार्ध सहज होईल याची काळजी घेतली. अखेर ४१व्या चालीला दोघींनी बरोबरी मान्य केली.

## रोहित शर्मा यशस्वी कर्णधारांपैकी एक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघांमध्ये मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या संघांची गणना केली जाते. दोन्हीही संघांनी आतापर्यंत सर्वाधिक पाचवेळा आयपीएल जिंकण्याची किमया साधली. महेंद्रसिंग धोनी आणि रोहित शर्मा यांच्या नेतृत्वात दोन्हीही संघ यशस्वी ठरले. दरम्यान, हैदराबादविरूद्धच्या सामन्यात



चेन्नईचा फलंदाजी प्रशिक्षक मायकल हसीशी समालोचकांनी संवाद साधला असता चेन्नईच्या संघ व्यवस्थापनाला कोणत्या एका कर्णधाराची भीती वाटते या प्रश्नावर मायकल हसी म्हणाला की, खरं सांगायचं झालं तर यंदाच्या हंगामात कोणीही असा कर्णधार नाही ज्याला आम्ही घाबरतो. फक्त एकच कर्णधार होता ज्याने आम्हाला अंतिम सामन्यात पराभूत केले आहे. पण, आता तो देखील कर्णधार राहिला नाही. तुम्हाला माहितीच असेल मी कोणाबद्दल बोलत आहे. एकूणच हसीने रोहित शर्माचे नाव न घेता त्याचे तोंडभरून कौतुक केले.

## अव्वल नेमबाजांची मागणी
## नेमबाजी पात्रता नियम शिथिल करा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिंपिक पात्रता चाचणी स्पर्धांमधील अटी शिथिल करा, अशी मागणी देशातील काही अव्वल नेमबाजांनी केली. त्याद्वारे त्यांना या पात्रता स्पर्धांत सहभागी होता येईल; परंतु राष्ट्रीय रायफल संघटनेने स्पष्ट नकार दिला आहे. प्रत्येक गटात राष्ट्रीय रँकिंगनुसार केवळ पाचच नेमबाज ऑलिंपिक पात्रता स्पर्धांत सहभागी होऊ शकतात, असा राष्ट्रीय नेमबाजी संघटनेचा नियम आहे. पॅरिसमध्ये होणाऱ्या ऑलिंपिकसाठी आता दिल्ली आणि भोपाळमध्ये



मिळून चार चाचणी स्पर्धा नियोजित आहेत. यातील पहिल्या दोन स्पर्धा दिल्लीतील कर्निसिंग रेंजवर १८ ते २७ एप्रिल, तर दुसरी स्पर्धा भोपाळमध्ये १० ते १९ मे दरम्यान होणार आहे.



## वानखेडेवर अनुभवणार आयपीएलचा थरार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सद्या आयपीएसची धुम सुरू आहे. सगळेच आयपीएल क्रिकेट सामन्याचा आनंद लुटत आहे. रविवारी (दि.७) वानखेडे स्टेडियमवरील लाईव्ह आयपीएल क्रिकेटचा थरार आता बच्चे कंपनीला अनुभवायला मिळणार आहे.

वानखेडे स्टेडियमवर होणाऱ्या मुंबई इंडियन्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल सामन्याचा आनंद मुलांना लुटता यावा यासाठी एज्युकेशन ऑफ स्पोर्ट्स अँड ऑल या संस्थेने तब्बल बेस्टच्या ५०० एसी व नॉन एसी बसेस बुक केल्या आहेत. यामध्ये एका बसचे भाडे १२ ते १६ हजार रुपये इतके आहे. बेस्टला यामुळे चांगला महसूल मिळणार आहे. यामुळे बच्चे कंपनीला प्रत्यक्ष स्टेडियमवरुन लाईव्ह आयपीएल क्रिकेटचा थरार अनुभवायला मिळणार आहे.

## भारतीय हॉकी संघाची प्रतीक्षा संपणार?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा पुरुष हॉकी संघ शनिवारपासुन बलाढ्य ऑस्ट्रेलियाशी दोन हात करत आहे. २०१४ नंतर भारतीय हॉकी संघाला ऑस्ट्रेलियात हॉकी मालिका विजय मिळवता आलेला नाही. यंदा तरी दहा वर्षांची प्रतीक्षा संपणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. पॅरिस ऑलिंपिकच्या तयारीसाठी दोन देशांमधील पाच सामन्यांची मालिका महत्त्वाची ठरणार आहे.



भारतीय संघ क्रमवारीत चौथ्या स्थानावर असून ऑस्ट्रेलियन संघ पाचव्या स्थानावर आहे. त्यामुळे दोन देशांमध्ये रोमहर्षक लढत हॉकीप्रेमींना पाहायला मिळणार हे निश्चित आहे. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वात भारतीय हॉकी संघाने फेब्रुवारी महिन्यात झालेल्या प्रो हॉकी लीगमधील लढतींमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. ऑस्ट्रेलियाने २८ सामन्यांमध्ये विजय मिळवले असून भारतीय संघाला फक्त आठ सामन्यांमध्ये विजय मिळवता आला आहे. दोन देशांमधील सात सामने ड्रॉ राहिले आहेत. मागील अकरा वर्षांच्या आकडेवारीवर नजर टाकता कांगारू अर्थातच ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व प्रकर्षाने दिसून येत आहे.

### हॉकी मालिकेचे वेळापत्रक

**पहिला सामना :-**
**६ एप्रिल (दुपारी २ वाजता)**
**दुसरा सामना :-**
**७ एप्रिल (दुपारी २ वाजता)**
**तिसरा सामना :-**
**१० एप्रिल (दुपारी ३ वाजता)**
**चौथा सामना :-**
**१२ एप्रिल (दुपारी ३ वाजता)**
**पाचवा सामना :-**
**१३ एप्रिल (दुपारी २ वाजता)**

## पीव्ही सिंधूची उबेर चषकातून माघार



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधू आणि दुहेरीतील अव्वल दोन संघांनी उबेर चषकातून माघार घेतली आहे. फेब्रुवारीमध्ये बॅडमिंटन आशिया चॅम्पियनशिपमधून पुनरागमन केल्यानंतर सिंधूने सहा स्पर्धा खेळल्या आहेत. पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी रिकव्हरी होण्यासाठी पुरेसा वेळ लागेल हे लक्षात घेऊन सिंधूने आपले नाव मागे घेतले आहे.


महिला दुहेरीत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद व अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रास्टो यांनीही आपली नावे मागे घेतली आहेत. ऑलिम्पिक पात्रतेसाठी त्याचे लक्ष इतर स्पर्धांवर आहे.

यावेळी सचिव संजय मिश्रा म्हणाले, ‘सिंधू दुखापतीनंतर पुनरागमन करत आहे आणि पॅरिस ऑलिम्पिकच्या तयारीसाठी तिला वेळ हवा आहे. दुहेरीच्या संघांनीही माघार घेतली आहे कारण त्यांनी अलीकडच्या काळात अनेक स्पर्धा खेळायच्या आहेत आणि आता पात्रतेवर लक्ष केंद्रित केले आहे.’

## अभिषेकने मोडला गेल-नरेनचा विक्रम

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ मधील १८ व्या सामन्यात हैदराबादने गतविजेत्या चेन्नईचा एकतर्फी ६ गडी राखून पराभव केला. त्याबरोबर या विजयाच्या जोरावर हंगामातील आपला दुसरा विजय नोंदवला. या सामन्यात हैदराबादला १६६ धावांचे लक्ष्य मिळाले होते, जेव्हा संघ त्याचा पाठलाग करण्यासाठी आला तेव्हा २३ वर्षीय अभिषेक शर्माने केवळ १२ चेंडूत ३७ धावांची खेळी करत सामना पूर्णपणे एकतर्फी केला. त्याच्या या खेळीच्या जोरावर हैदराबादने हे लक्ष्य केवळ १८.१ षटकांत ४ गडी गमावून पूर्ण केले. या दरम्यान अभिषेकने ख्रिस गेल आणि सुनील नरेन यांच्या नावावर असलेला एक विक्रमही मोडीत काढला.



चेन्नईच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी सनरायझर्स हैदराबाद संघ मैदानात उतरला, तेव्हा अभिषेक शर्माने डावाचे दुसरे षटक टाकण्यासाठी आलेल्या मुकेश चौधरीविरुद्ध आक्रमक पवित्रा स्वीकारला. त्याने या षटकात ३ षटकार आणि २ चौकारांसह एकूण २६ धावा केल्या. यासह, तो आयपीएलच्या इतिहासात एका डावाच्या दुसऱ्या षटकात सर्वाधिक धावा करणारा खेळाडू बनला आहे. त्याने याबाबतीत वेस्ट इंडिजचे दिग्गज ख्रिस गेल आणि सुनील नरेन यांना मागे टाकले.

यापूर्वी हा विक्रम सुनील नरेन आणि ख्रिस गेलच्या नावावर होता, या दोन्ही खेळाडूंनी २४-२४ धावा केल्या होत्या. या हंगामाता आतापर्यंत अभिषेकचा फॉर्म खूपच चांगला आहे, ज्यामध्ये तो १६१ धावांसह ऑरेंज कॅपच्या शर्यतीत पाचव्या स्थानावर पोहोचला आहे, ज्यामध्ये त्याने २१७.५७ च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या आहेत.

## फिफा क्रमवारीत भारताची घसरण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

फिफा क्रमवारीत भारतीय फुटबॉल संघ चार स्थानांनी घसरून १२१व्याक्रमांकावरपोहोचला आहे, जी गेल्या काही वर्षांतील त्यांची सर्वात वाईट कामगिरी आहे. गेल्या महिन्यात गुवाहाटी येथे झालेल्या फिफा विश्वचषक २०२६ पात्रता फेरीच्या दुसऱ्या फेरीत भारताचा अफगाणिस्तानकडून २-० असा पराभव झाला होता.



गेल्या वर्षी भारताने आंतरखंडीय चषक, त्रिकोणी स्पर्धा आणि चॅम्पियनशिप जिंकून अव्वल १०० मध्ये पोहोचले होते, परंतु २६ मार्च रोजी खालच्या क्रमांकावर असलेल्या अफगाणिस्तान संघाविरुद्धचा पराभव अनपेक्षित होता. जानेवारीमध्ये झालेल्या आशियाई कपमध्ये भारतीय संघ एकही सामना जिंकू शकला नाही आणि चार संघांच्या ‘ब’ गटात चौथ्या स्थानावर राहिला. गतविजेता अर्जेंटिना अव्वल तर फ्रान्स दुसऱ्या, इंग्लंड तिसऱ्या आणि बेल्जियम चौथ्या क्रमांकावर आहे. तर, ब्राझील पाचव्या स्थानावर आहे.

## श्रेयसचे गौरवपूर्ण यश
## सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक

**। पनवेल । वार्ताहर ।**

श्रेयस दिपक पराडकर याने मांड्या कर्नाटक येथे ३१ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत आयोजित केलेल्या जलतरण राष्ट्रीय अजिंक्यपद स्पेशल ऑलिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदकाची हॅटट्रिक लगावली आहे. या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत एकूण १३ राज्यातील स्पर्धकांचा सहभाग होता. श्रेयसने ५० मीटर फ्री स्टाईल, ५० मीटर बटरफ्लाय आणि २५-४ मीटर फ्रीस्टाईल रिले स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे.

या अगोदर नागपूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत श्रेयसने दोन गोल्ड मेडल मिळवून महाराष्ट्र राज्यातर्फे नॅशनल




स्पर्धेसाठी पात्र होण्याचा मान मिळवला आणि नक्कीच त्या पात्रतेचा गौरव त्यानी मांड्या कर्नाटक येथील राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक लगावून महाराष्ट्र राज्यसाठी सार्थकी लावला. पुढील तीन वर्षे श्रेयससाठी अत्यंत महत्वाची आहेत कारण अशीच कामगिरी त्यानी येत्या तीन वर्षात बाहेरील राज्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पेशल जलतरण स्पर्धेत बजावली तर तो आंतरराष्ट्रीय स्पेशल ऑलिम्पिक जलतरण स्पर्धेसाठी निवडला जाऊ शकतो. तसेच, देशाचे स्पेशल जलतरण स्पर्धेसाठी प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी त्याला प्राप्त होऊ शकते. श्रेयसच्या या दैदिप्यमान, अभिमानास्पद आणि गौरवाशाली यशामागे त्याचे पालक जे.एम. राठी, जलतरण तलाव मार्गदर्शक भुषण शिर्के, माजी मार्गदर्शक तावडे, मेहेंदळे हायस्कुल रोहा येथील सर्व शिक्षक वर्ग, मुख्याध्यापक, मित्रपरिवार, प्रेरणा मतिमंद मुलांची शाळा रोहा येथील अध्यक्ष व शिक्षकवर्ग आणि स्पेशल भारत ऑलिम्पिक सर्व मार्गदर्शक आणि शुभचिंतक या सर्वाचा महत्वाचा सहभाग आहे.

या स्पर्धेसाठी श्रेयस हा एकटा पालकांच्या मदतीशिवाय दोन मार्गदर्शक सुनील आडे आणि कांचन बडवे यांच्या सहाय्याने कर्नाटकात जाऊन स्पर्धेत सहभागी झाला.

## ‘सूर्या’ आला रे...
### मुंबई इंडियन्सला मोठा दिलासा!

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**पराभवाच्या दरीत हेलखावे खात असलेल्या मुंबई इंडियन्सला सर्वात मोठा दिलासा मिळाला आहे. मोठ्या प्रतिक्षेनंतर तडाखेबाज फलंदाज सूर्यकुमार यादव तंदुरुस्त होऊन संघात दाखल झाला. मुंबईने सोशल मिडियावर सूर्यकुमारचा व्हीडिओ पोस्ट करत ही माहिती दिली. मुंबईने पोस्ट केलेल्या या व्हीडिओमध्ये सूर्यकूमार यादव हा कारमधून उतरत संघाच्या हॉटेलमध्ये जात आहे. काही दिवसांपासून सूर्यकुमार यादव संघात परतत असण्याची चर्चा सुरु होती. पण आता सूर्या संघात परतला आहे, ज्यामुळे मुंबई संघाचा अर्धा ताण नक्कीच कमी झाला आहे. इतकेच नव्हे तर सूर्याने संघात दाखल होताच लगेच सरावाला सुरूवात केली आहे.**



दक्षिण आफ्रिकेतील टी-२० मालिकेदरम्यान यादवच्या घोट्याला दुखापत झाली होती आणि सुरुवातीला तो सात आठवड्यांसाठी क्रिकेटपासून दूर राहणार हे निश्चित होते. या आधी गुडघ्यावरील शस्त्रक्रिया आणि त्यानंतर स्पोर्ट्स हार्निया अशा दुखापती झालेला सूर्यकुमार गेल्या काही महिन्यांपासून क्रिकेटपासून दूर होता.

सूर्यकुमार हा आयसीसीच्या टी-२० क्रवारीत अव्वल स्थानावर असलेला फलंदाज आहे. त्यामुळे त्याची उणीव भासणे स्वाभाविक आहे. वानखेडे स्टेडियमवर राजस्थानविरुद्धच्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघाची फलंदाजी ढेपाळत असताना सूर्यकुमारची उणीव भासत होती. गत आयपीएलमध्येही सूर्यकुमार सुरुवातीचे काही सामने दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता.

मुंबई इंडियन्सच्या पहिल्या तीन सामन्यांमध्ये सूर्यकुमार यादव सहभागी होऊ शकला नाही. दुखापती आणि शस्त्रक्रियेनंतर, सूर्यकुमार यादव बंगळुरूमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये फिटनेसवर काम करत होता. गेल्या तीन महिन्यांपासून क्रिकेटच्या मैदानापासून लांब असलेल्या सूर्यकुमारला बुधवारी एनसीएने फिट घोषित केले. फिजिओ आणि बीसीसीआयने सूर्या सामना खेळण्यासाठी पूर्णपणे तंदुरूस्त आहे का, याची खात्री करूनच त्याला हिरवा कंदील दिला. आता रविवारी (दि.७)वानखेडे स्टेडियमवर दिल्लीविरुद्ध होणाऱ्या सामन्याद्वारे तो पुनरागमन करेल.

## विश्वचषकाची तयारी की आर्मी भरतीचा सराव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान क्रिकेट संघाचे येत्या काही महिन्यातील वेळापत्रक बरेच व्यस्त आहे. आता त्यांना १८ एप्रिलपासून मायदेशात न्यूझीलंड विरुद्ध टी-२० मालिका खेळायची आहे. त्यानंतर आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्ध देखील मालिका खेळायच्या असून त्यानंतर जूनमध्ये टी-२० वर्ल्डकपमध्येही पाकिस्तान संघ सहभागी होणार आहे. अशात या सामन्यांपूर्वी पाकिस्तानचा संघ मोठे कष्ट घेताना दिसत आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान संघ आर्मी ट्रेनिंग घेतानाही दिसला.

नुकताच पाकिस्तान क्रिकेटने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये



पाकिस्तानचे खेळाडू आर्मीप्रमाणेच ट्रेनिंग करताना दिसत आहेत. ते वेगवेगळे व्यायाम प्रकार करताना दिसत आहेत. त्याचबरोबर ड्रिल करतानाही दिसत आहेत. हे ट्रेनिंग त्यांनी अबोटाबादमधील आर्मी स्कूल ऑफ फिजिकल ट्रेनिंग येथे घेतली आहे. पाकिस्तान संघाच्या या ट्रेनिंग दरम्यानचे अनेक व्हिडिओही सध्या व्हायरल होत आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)